

छात्र
प्रबोधन
सौर वैशाख शके १९२३
वर्ष १ अंक ८
मुला-मुलींच्या
साहित्य-चित्रकृतींनी
नटलेला खास अंक!
'भावगंध'
फाटक हायस्कूल,
रत्नागिरी.
ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!

# छात्र प्रबोधनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या जाहिरात स्पर्धेतील विविध जाहिरातींमधील उत्तम जाहिराती



**'कल्पवृक्ष'**,
अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत.




**'भावगंध'**,
फाटक हायस्कूल, रत्नागिरी.




**'कस्तुरी'**,
न्यू इंग्लिश स्कूल, सातारा.



**'स्वानंद'**,
गोगटे क्लास, पेण.

छात्र
# प्रबोधन
वर्ष १ अंक ८
सौर चैत्र शके १९२३




**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E. M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
श्री. दत्ता टोळ B.A., B.Com
**कार्यकारी संपादक**
वर्षा कुलकर्णी
**मुखपृष्ठ व आतील सजावट**
**'भावबंध'**, हस्तलिखित
फाटक हायस्कूल, रत्नागिरी.
**मुखपृष्ठावरील कविता**
श्री. बजरंग सरोदे
'कौस्तुभ', रणपिसे नगर,
अकोला- ४४४००१
**अक्षरजुळणी**
छात्र प्रबोधन, पुणे ३०
**संपर्क पत्ता - छात्र प्रबोधन,**
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ
पुणे ३० (०२०) ☎ २४४७७६९१,
४४७८०९५ फॅक्स : २४४९१८०६
E-mail : prabodhini@vsnl.com

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर ११ वैशाख शके १९२३
१ मे २००१

## अंतरंग

२ संवाद - शैलजा देशमुख
३ संत परंपरा
५ डी.एन.ए. ची किमया - चि. वैभव जागुष्टे, चि. रोहित पांढारकर
८ कविता - ढगांशी गप्पा - चि. सुयोग आबनावे
अहंकार - कु. नेहा गोडबोले
मूल्यांचा फेर - कु. भावना पटवर्धन
९ केशवसुत स्मारकामधील भारावलेपण - चि. श्रेयस उकिडवे
११ सुट्टीतील छंद खोडरबरांचा संग्रह - कु. सुप्रिया व चि.सचिन भुर्के
१३ फिरकी - कु. प्राजक्ता सपकाळ
१५ संस्था परिचय धुळ्याचे राजवाडे संशोधन मंदिर - कु. शीतल भिरुड
१७ पैज कोणी जिंकली ? - कु. मानसी जोशी
१९ विनोद सम्राट पुलं. - कु. भक्ती नेर्लेकर
२१ वाचलेच पाहिजे असे काही Children Who Made It Big - कु. वल्लरी मोरगावकर
२३ लोणार - वैज्ञानिक नजरेतून - कु. मनाली कुलकर्णी
२५ कलियुगातील कुंभकर्ण - कु. स्नेहा देशपांडे
२७ कचरा - चि.कौस्तुभ भुरके
२९ कविता - मला एक कळत नाही - कु. वृंदा नांदगिरीकर
शिंपल्यांची माळ - कु. दीप्ती चव्हाण
३० व्हॅलेंटाइन डे- बदलता दृष्टिकोन - कु. मीनल अकोले, कु. शर्वरी कुलकर्णी
३२ शिबिरवृत्त

**वर्गणी :** वार्षिक : रु. १५०/- द्वैवार्षिक : रु. २७५/-
त्रैवार्षिक: रु. ४००/- आजीवन : रु.२०००/-
या अंकाची किंमत : रु. १२/-
दिवाळी अंक रजिस्टरने हवा असल्यास प्रतिवर्षी रु. ३०/- जास्तीचे भरावेत.

मोगऱ्याचा धुंद वास अंथरून पावलात, आला नाचत वसंत- सडा शिंपीत शिंपीत.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे ! ...विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ

## संवाद

**प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,**

*वासंतिक सुट्टीची मज्जाच मज्जा चालू असेल ना? मित्रमैत्रिणींच्या बरोबर मनसोक्त खेळणं, भटकणं, गप्पा मारणं, वेगवेगळ्या शिबिरांत रंगून जाणं, फावल्या वेळात पुस्तकाच्या राज्यातली स्वच्छंद सफर, हवं तेव्हा झोपावं, खेळावं, पाहुण्यांच्या सहवासात रमून जावं. कलिंगड, आंबे, फणस यासारख्या सुमधुर फळांचा आस्वाद घ्यावा, निसर्गातली विविध फुलांच्या रंगांची, गंधांची उधळण अनुभवावी, पोहोताना थंडगार पाण्याशी दोस्ती करावी.... अशी ही सुट्टी संपूच नये, असं वाटत असेल ना?*

*वासंतिक विशेषांकातील सुंदर कथांचा आस्वाद घेऊन होतोय न् होतोय तोच, हा अगदी खास तुमचाच असा अंक तुमच्या भेटीला आलाय. अगदी नेहमीच्या परंपरेला साजेसा असाच! सर्व लेख तुमचेच, त्याला साजेशी चित्रेही तुमची आणि सुंदरसे मुखपृष्ठही तुमचेच! फक्त संपादन आमचं! मात्र यापुढे पुन्हा जेव्हा मुलांचा अंक प्रकाशित करायचा असेल तोपर्यंत तुमचा सहभाग इतका वाढायला हवा की त्यावेळी संपादन, संवाद लेखन, पानाखालील काव्यपंक्तींची निवड वगैरे सबकुछ तुमचंच असेल!*

*हस्तलिखिताच्या निमित्ताने, वा मुलांचा खास अंक यानिमित्ताने अगदी प्रौढांसारखं दर्जेदार लेखन करू शकणारी तुम्ही मंडळी, एरवी मात्र लेखन पाठवण्याबाबत उदासिन असता, ही माझी खास तक्रार आहे. एखादा अगदी साधासा प्रसंग आपल्या आयुष्यात घडतो; तो जरी शब्दबद्ध केला तरी छानसा लेख तयार होतो. तुमच्या रोजनिशीचं एखादं पानही खूप बोलकं असतं. कवितेतही असेच, तुमचे अनुभव आणि कल्पना याचा मेळ जमला की छान कविता जन्माला येते. जसं गायक व्हायला 'गाता गळा' हवा, तसं लेखक होणं ही फार पुढची गोष्ट... पण आपले विचार, भावना स्पष्टपणे व्यक्त करता येण्यासाठी तरी 'लिहिता हात' हवा!*


*'छात्र प्रबोधन' तर्फे आयोजित केली जाणारी काही शिबिरे संपन्न झाली तर काही अजून व्हायची आहेत. त्याची सविस्तर वृत्ते अजून पूर्णतः हाती आलेली नाहीत. तुमच्यापैकी काही जणांनी ती प्रत्यक्ष अनुभवली असतील. बाकीच्यांसाठी त्यांची वृत्तं पुढील अंकात प्रसिद्ध करूच!*

*सुट्टीतील भटकंती, सहली उघड्या डोळ्यांनी खुल्या मनाने करून घ्या. इथल्या मातीची परंपरा, इतिहास, भूगोल, मुख्यतः इथली माणसं समजून घ्यायचा प्रयत्न करा. मजा करताकरता हे सहज जमायला हवं. तसंच आपल्या छंदांची जोपासना करण्याचे हेच तर दिवस! सुट्टीत आपल्या शहरात, गावात होणारी वेगवेगळी व्याख्यानं ऐकायला जरूर जा. छानसे चित्रपट, नाटकंसुद्धा पाहा बरं का! एखादं चांगलं काम करण्याचा संकल्प वर्षभराच्या अभ्यासाच्या गडबडींत पुरा करता आला नसेल; आता मात्र त्यासाठी आपल्याकडे पुरेसा वेळ आहे हे विसरू नका.*

*नाशिकच्या शिबिराला गेले असता महेंद्रभाईंना छोटासा अपघात झालाय. त्यामुळे यावेळी ते तुमच्याशी संवाद साधू शकत नाहीत. लवकरच बरे होऊन ते नेहमीच्या उत्साहाने कामाला सुरुवात करतील; ही सदिच्छा!*

***मित्रांनो, पुढच्या वर्षीच्या अभ्यासासाठी शरीरानं आणि मनानं ताजंतवानं व्हायचंय ना? मग सुट्टीत भरपूर वाचा, खूप खेळा, खूप भटका अन् महत्त्वाचं म्हणजे खूपखूप नवेनवे अनुभव घ्या.***

**सस्नेह तुमची,**




**(शैलजा देशमुख)**



शब्द असावे मोकळे, दिगंतरा स्पर्शू जावे। निळ्या आभाळी पाखरे, त्यांच्यासंगे गाणे गावे।।

# संत परंपरा



आपल्या महाराष्ट्राला अभिमान वाटावा, अशी संत परंपरा आपल्याला लाभली आहे. ज्यावेळी आपल्या समाजात अंधश्रद्धा वाढली होती, हरिजन, अस्पृश्यांचा छळ होत होता, उच्चवर्णियांनी समाजात आपली पाळंमुळं घट्ट रोवली होती, समाज मरगळला होता, बरं काय, वाईट काय सांगणारा कुणी नव्हता, अशावेळी संत ज्ञानेश्वरांचा जन्म झाला.

संत ज्ञानेश्वरांना सामाजिक छळांना तोंड द्यावं लागलं. ज्ञानेश्वर आणि त्यांच्या भावंडांचा तत्कालीन स्वार्थी, भोंदू लोकांनी अनन्वित छळ केला. संन्याशाची मुलं म्हणून त्यांना वाळीत टाकलं. ग्रंथांचं वाचन आणि पठण ही फक्त उच्चवर्णियांचीच मक्तेदारी होती, हे ज्ञानेश्वरांनी ताडलं. जी भगवत्‌गीता कृष्णाने सांगितली तिचा अप्रतिम भाष्यग्रंथ मराठीत जाणीवपूर्वक लिहिला. भक्ती करण्याचा- परमेश्वराची सेवा करण्याचा हक्क प्रत्येक माणसाला आहे, हे ज्ञानदेवांनी पटवून दिलं. ज्ञानेश्वरांनी जन्मभर समाजाकडून उपेक्षा व त्रास सहन केला. परंतु त्यांनी सर्व भूतमात्रांवर तसेच समाजावरही प्रेम केले.

*'जो जे वांछील तो ते लाहो,*
*प्राणिजात'*

असेच पसायदान ईश्वराजवळ मागितले. एकदा ते रागावून झोपडीचे दार लावून बसले होते. तेव्हा मुक्ताबाईने 'ताटीचे अभंग' म्हटले. यातील उपदेशही संतांचे मोठेपण सिद्ध करणारा आहे. मुक्ताबाई म्हणते-

*'विश्व रागे झाले वन्हि,*
*संते सुखे व्हावे पाणी'*

तेव्हा जग कितीही वाईट वागले तरी संतांनी न रागवता आपले जीवितकार्य पुढे चालूच ठेवावे. केवळ ब्राह्मणच नव्हे तर संत ज्ञानेश्वरांचे समकालीन नरहरी सोनार, चोखामेळा, सावतामाळी, जनाबाई, कान्होपात्रा, गोराकुंभार या संतजनांनी उत्तमोत्तम अभंगरचना केली. मनापासून केलेली पूजा परमेश्वराला पावते हे त्यांनी पटवून दिले.

बाराव्या शतकात जन्माला आलेल्या संत नामदेवांनी

*'नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी',*
*देह जावो अथवा राहो-*
*पांडुरंगी दृढ भावो'*

असे एकाहून एक रसाळ अभंग रचले. संत नामदेवांचे अभंग शिखांच्या गुरू ग्रंथसाहेबातही समाविष्ट झाले आहेत.

संत एकनाथ पंधराव्या शतकात जन्माला आले. परमार्थ बुद्धीने प्रपंच करावा, हे नाथांनी समाजाला सांगितलं. 'आधी केले मग सांगितले' या तत्त्वानुसार नाथांना जे योग्य वाटलं ते त्यांनी आचरणात आणलं. त्यांनी माणसा-माणसात कधीही भेदभाव केला नाही. रडणारं हरिजनाचं मूल त्यांनी उचलून घेतलं. ते स्वत: महाराच्या घरी जेवले. वडिलांच्या श्राद्धादिवशी गावातील महारांना स्वत:च्या घरी आणून जेवायला घातलं. त्यांची भूतदया माणसापुरतीच सीमित नव्हती तर तमाम प्राणीमात्रांसाठीही होती. म्हणून तर त्यांनी तहानेनं तडफडणाऱ्या गाढवासाठी, काशीहून आणलेली गंगाजळाची कावड रिकामी केली. नाथांचे 'भागवत' हा मराठी साहित्यशारदेच्या दरबारातील एक अलंकार आहे. त्यांची भारूडे, गौळणी, अभंग, हरिपाठ अशा विविध रचना म्हणजे सामाजिक समतेचा आचरणसिद्ध पुरस्कार करणाऱ्या आहेत. नाथांनी सर्व प्रकारच्या लोकसाहित्याला प्रतिष्ठा मिळवून दिली. संतांचा महिमा सांगताना एकनाथ सांगतात- *'संत नाम गाय कामधेनू'* कामधेनूप्रमाणे

**सोशिले तू हाल सारे, सहन केल्या यातना। तरि मनी तव फुलून आल्या विश्वव्यापक भावना।।**

एकविसाव्या शतकात कोणतेही काम करताना, विवेक व सजगता यांचे भान ठेवा. जगा व जगू द्या.

संत भक्तांच्या इच्छा पुरवतात. त्यांना ईश्वराजवळ जाण्यास मदत करतात.

सतराव्या शतकात धर्मातील कर्मठपणा पराकोटीला गेला होता. निरनिराळ्या बंधनांत माणूस एवढा जखडला गेला होता की तो परमेश्वराची भक्तिसुद्धा मनापासून करू शकत नव्हता. अशावेळी तुकारामांचा जन्म झाला.

तुकारामांकडे पुस्तकी शिक्षण फारसं नव्हतं. पण त्यांच्या बुद्धीला ज्ञानाचा, परमात्म्याचा एक अलौकिक स्पर्श लाभला होता. त्यांच्या तरुणपणातच लागोपाठ आलेल्या दुष्काळापदी आपत्तीतून, त्यांच्या मनाला वैराग्य प्राप्त झालं. त्यांनी एकांतात केलेल्या अभ्यासातून केलेली अभंगरचना अमर झाली. सामाजिक छळांचे चटके सोशीत त्यांनी, सामाजिक दोषांवर कोरडे ओढणारे धारदार अभंग रचले. तुकारामांची भक्ती जशी गोड तशी त्यांची विठ्ठलप्रीतीही अजोड होती.

*'जे का रंजले गांजले*
*त्यांसी म्हणे जो आपुले।*
*तोचि साधु ओळखावा*
*देव तेथेचि जाणावा।।*

या अभंगात त्यांची पीडितांविषयीची कळकळ जाणवते.

*'मऊ मेणाहून आम्ही विष्णुदास,*
*कठीण वज्रास भेदू ऐसे'*
*किंवा 'भले तरी देऊ कासेची लंगोटी,*
*नाठाळाचे काठी देऊ माथा।।'*

ह्या अभंगातून त्यांची दांभिक समाजाविषयीची चीड स्पष्टपणे जाणवते. ज्ञानदेवांनी ज्या भागवत धर्माचा पाया घातला, ज्याला एकनाथांनी आधार दिला. त्या भागवत धर्मावर तुकारामांनी कळस चढवला.

महाराष्ट्रात जन्माला आलेल्या साऱ्या संतांमध्ये संत रामदासांचे कार्य वेगळं आहे. रामदासांनी मुख्यत्वे सामाजिक पुनरुत्थानासाठी कार्य केलं. शिवाजी महाराजांना 'जनकल्याणकारी राजा' होण्यासाठी रामदास स्वामींचं मार्गदर्शन लाभलं. राजांना त्यांनी सांगितलं, ''क्षत्रिय धर्माचं पालन कर. प्राण गेला तरी धर्म सोडू नकोस. प्रजेच्या रक्षणासाठीच तुझा जन्म झाला आहे.'' दासबोध हा संत रामदासांचा ग्रंथ म्हणजे जगावं कसं हे सांगणारा आदर्श वस्तुपाठच आहे.

परमेश्वराशी तादात्म्य पावणारे, दुसऱ्यांच्या भल्यासाठी आयुष्य वेचणारे अनेक संत आपल्या महाराष्ट्रात जन्माला आले. गाडगेमहाराज, गुलाबराव महाराज यांनीही सन्मार्गाचा अवलंब केला. दांभिकतेवर प्रहार केला. भक्ती, ज्ञान, कर्म, तत्त्वज्ञान यांचा पुरस्कार केला.

साऱ्याच संतांनी ईश्वरभक्तीची शिकवण दिली. समाजात कसे वागावे याबद्दल चोखामेळा म्हणतात.

*'ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा,*
*काय भुललासी वरलिया रंगा,'*

तसेच रामदास स्वामीही आपल्या विवेचनात म्हणतात,

*'सामर्थ्य आहे चळवळीचे,*
*जो जो करील तयाचे'*

अशा तऱ्हेचा उपदेश संतांनी केला आणि माणसाला खऱ्या अर्थाने माणूस बनवण्याचा प्रयत्न केला.

संतांचे आणखी एक महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी जाती, जमातीतील भेदभाव नष्ट करण्याचा प्रयत्न केला. *'भेदाभेद भ्रम अमंगळ'* असे सांगून देवाच्या पायाशी सर्व माणसे सारखीच आहेत, सर्वांनी बंधुभावाने राहावे, अनाथ अपंगांच्या कल्याणासाठी झटावे, अशी शिकवण संतांनी दिली. संतांना नेहमी, दुसऱ्याच्या सुखात आपल्याला सुख लाभते असे वाटते. सर्व समाज सुखी व्हावा, त्यातले हीन नष्ट व्हावे यासाठी संत आयुष्यभर झटले.

तेव्हा अशा तऱ्हेने संतांचे कार्य ऐतिहासिक आहे, सामाजिक आहे. त्यांच्या काळात समाजोन्नतीसाठी त्यांनी कार्य केले. पण आजही त्यांचे अभंग त्रिकालाबाधित सत्ये सांगत असतात. तेव्हा त्यांची महती जाणून

'दया, क्षमा, शांती।
तेथे देवाची वस्ती ।।''

हे तत्त्व अंगी बाणवून घेतले पाहिजे. 'साधु संत येती घरा।
तोचि दिवाळी दसरा।।'' असं म्हणतात. महाराष्ट्राला लाभलेली श्रेष्ठ संतांची परंपरा हेच महाराष्ट्राचं गौरवस्थान आहे. ती परंपरा जाणून घेऊन पुढे नेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे.


***

**'संत वाङ्मय'**
पी.जोग हायस्कूल,
पुणे – २९.



**ज्ञान करुणेची पताका घेऊनी तू चालला। शुद्ध प्रेमळ भक्तिचा तू मार्ग सर्वा दाविला।।**

''शंका कसली? किमया असली, घडवू या हातांनी, सान वयातच स्वराज्य तोरण बांधियले शिवबांनी.''



# डी.एन.ए.ची किमया

**चि. वैभव जागुष्टे, चि.रोहित पांढारकर**

''मी स्वत: जीवशास्त्रज्ञ डॉ. स्मिथ. आज मी तुम्हाला एक अशी गोष्ट सांगणार आहे की जी ऐकून तुम्हाला विसाव्या शतकातील शास्त्र व गुन्हेगारी या दोन्हीची पुरती कल्पना येईल. मी जीवशास्त्रज्ञाबरोबरच एक सी.आय.डी. (CID) ऑफिसरही आहे.

माझ्या स्वत:च्या गुप्तहेरीच्या नोकरीतील ३० वर्षांमध्ये असा अनुभव मला कधीच आला नव्हता. २८ सप्टेंबर १९८४ ला आम्हाला सुप्रसिद्ध व्यापारी, सर केविन विल्सन यांचे शरीर मृत अवस्थेत, शहराच्या बाहेरच्या रानामधून जाणाऱ्या हायवेजवळ सापडले.

वास्तविक पाहता त्यांच्या अंगावरील जखमांच्या खुणांवरून तरी असे स्पष्ट होत होते की, त्यांचा मृत्यू हा कोणाशीतरी झालेल्या झटापटीत झाला असावा. पण गूढ हे होते की, पोस्टमार्टेम (शव विच्छेदन) मध्येतरी डॉक्टरांनी असे स्पष्ट केले की, त्यांचा मृत्यू किंवा खून हा गळा दाबल्यामुळे, एखाद्या वस्तुने डोक्यावर प्रहार केल्याने, चाकूने किंवा विष देऊनही झाला नव्हता. त्यांचा हृदयाबद्दलचा रिपोर्ट पण नॉर्मल मिळाला असल्याने 'हार्ट फेल्युअरमुळे मृत्यू' हा पर्यायही काटला गेला. मग सर्वांपुढे प्रश्न उभा राहिला की, 'नक्की मृत्यू झाला कसा?' आणखी एक गोष्ट म्हणजे सर विल्सन यांच्या शरीरामध्ये डॉक्टरांना एक अँटी बायोटिक केमिकल सापडलं होतं, त्याचा कसलाही सुगावा पुढे लागला नाही.

मग दुसऱ्या बाजूने चौकशीस सुरुवात झाली. सर विल्सन हे इम्पोर्ट-एक्सपोटचा धंदा करीत होते. त्यांच्या व्यापारामध्ये त्यांनी बरीच प्रगती केली होती. पण त्यांच्या असिस्टंटकडून माहिती मिळाली की त्यांचे अनिष्ट चिंतकही बरेच होते. त्यांच्या एका मित्राचा धंदा व्यक्तिगत वैमनस्यामुळे शासकीय कारवाई करून बसवला होता. एका माणसाची मोठी व्यावहारिक फसवणूक केली होती. एकाला मारण्याबद्दल धमक्या देणं वगैरे चालू होतं. त्यानं माझ्याशी बोलण्यात विशेष रस दाखवला होता. नंतर असं कळलं की तोही एक जीवशास्त्रज्ञच होता. बायो-केमिस्ट्रीचा त्याने खोलवर अभ्यास केला होता.

पण सर विल्सनच्या पत्नीकडूनही त्यांचे असिस्टंट, म्हणजे विल्यम फालेरो यांच्याबद्दल जास्त माहिती आम्हाला मिळाली नाही. नंतर मिस्टर फालोरोंच्या मते संशयित असलेल्या सर्वांची कसून चौकशी केली. पण चौकशीअंती असे निदर्शनास आले की, त्या सर्वांच्याच वैमनस्याची कारणे ही खून करण्यास प्रवृत्त करण्यासाठी पुरेशी नव्हती.

मग खुनी कोण असेल? मृत्यू कसा झाला असेल? हे प्रश्न आणखीनच खोलात जाऊ लागले. मला वाटत होतं की याचा अजून खोलवर विचार केला पाहिजे. मग मी मि. फालेरोंच्या मते संशयित असलेल्या सर्व जणांना २६, २७, २८, २९ सप्टेंबर या दिवसांत ते कुठे होते? काय करत होते? हे ठोस पुराव्यांसकट सिद्ध करण्यास सांगितले. काय सांगावं, आज कुठल्या कारणावरून कोण काय-काय करू शकतं? वर-वर जरी त्या संशयितांची सर विल्सनशी वाकडे संबंध असण्याची कारणे सामान्य वाटत असली तरी इथे काहीतरी अकल्पित नक्कीच घडलं असणार, असं माझं मन मला सांगत होतं.

आश्चर्य म्हणजे सर्वांनीच आपला, विल्सन मृत्यू प्रकरणी काहीही संबंध नसल्याचे खुलासे देऊन अगदी पक्क्या पुराव्यांसकट स्पष्ट केले.

मला हे कोडे काही केल्या उलगडेना. नंतर मी एका पोलिस अधिकाऱ्याच्या संमतीने सर विल्सन यांच्या शवाच्या पुनर्छाननीचा अर्ज केला.

माझी या पुनर्छाननीकडून खूप आशा होती. मी सर विल्सन यांच्या पुनर्शवविच्छेदनाचा अंतिम अहवाल पाहण्यासाठी, फारच आतुर होतो.

अखेर एक आठवड्यानंतर डॉक्टरांकडून अहवाल आला. मी तो चारचारदा वाचून काढला, पण मागच्या आणि या अहवालामध्ये फारसा फरक नव्हताच.

पण एक गोष्ट मला प्रकर्षाने जाणवली की, याही अहवालामध्ये असं दिलं होतं की, 'शवामध्ये ॲन्टीबायोटिक केमिकलचे अंश सापडले आहेत' मला परत ही बाब खटकू लागली. मला ॲन्टीबायोटिक

**यश चालले दूर परंतु बुद्धिवर विश्वास असे, परि मनिमानसी त्याच्या हे असह्य ओझे दिसे**

'सबसे बडी कला है मन को ईश्वर में लगाना।'

केमिकल्सबद्दल माहिती होती, पण तरी मला त्याबद्दल काही सुगावा लागत नव्हता. मग मी बायोकेमिस्ट्री तज्ज्ञ मिस्टर डिसुझांकडे गेलो. त्यांना अहवालामध्ये आलेल्या अ‍ॅन्टीबायोटिक केमिकल्सबद्दल मी सांगितलं. त्यांच्याकडून फारच महत्त्वाची माहिती मला मिळाली. ते केमिकल अ‍ॅनालाईज करून त्यांनी आम्हाला असं सांगितलं की, हे अ‍ॅन्टीबायोटिक केमिकल 'आर्सेनिक' या विषाच्या प्रयोगानंतर बचावासाठी रोग्याला दिलं जातं. आर्सेनिक शरीरात गेल्यानंतर हे केमिकल शरीरात सोडल्यास ते आर्सेनिक अंश नष्ट करून टाकतं. म्हणजेच ते आर्सेनिक मॉलेक्यूलबरोबर रिअ‍ॅक्ट होऊन ऑर्गेनिक कंपाउंड बनवतं आणि त्यामुळे आर्सेनिकचे शरीरातील अंश जैविक संयुगांमध्ये बदलले जातात.

मि. डिसुझांनी दिलेल्या अनमोल माहितीमुळे सर विल्सनचा मृत्यू कसा झाला या प्रश्नाचं उत्तर मला मिळालं. आता माझ्यापुढे दोन पर्याय उभे राहिले. - १) एकतर सर विल्सननी स्वत: वैयक्तिक दु:खामुळे कंटाळून विष घेतलं असावं आणि नंतर त्यांना आपले प्राण, आपलं जीवन हवंहवंसं वाटलं असावं. म्हणून त्यांनी अ‍ॅन्टीबायोटिक (अ‍ॅन्टीपॉयझनिक केमिकल) घेतलं असावं, पण ते घेण्यास उशीर झाल्याने त्यांचा मृत्यू झाला असावा. २) नाहीतर दुसऱ्या कोणीतरी त्यांना विष पाजलं असेल आणि नंतर त्यांनी बचावासाठी अ‍ॅन्टीबायोटिक घेतलं असेल; पण तरीही ते वाचू शकले नसतील.


पण मग त्यांचा देह हायवेजवळ कसा आला? त्यांच्या अंगावरील खुणा दुसऱ्याशी झालेल्या झटापटीत झाल्या होत्या की विषबाधा झाल्यामुळे विव्हळून धडपडताना झाल्या होत्या?

सगळीकडे नुसती प्रश्नचिन्हं! मी पुन्हा सुरुवातीपासून विचार केला-सर विल्सन- शत्रू- विषबाधा- हायवेजवळ झटापट- मृत्यू- माझ्या मनानं असा प्रश्न उपस्थित केला की, एवढ्या रानभागातल्या हायवेवर सर विल्सनना अ‍ॅन्टी पॉयझनिक मिळालंच कसं? आणि कुठे?

जर मी चुकीच्या बाजूने विचार करत असेन तर नक्की काय घडले असेल? मग मी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन शोध घ्यायचं ठरवलं. मी मि. फालोरोंना घेऊन त्यांच्याच गाडीतून घटनास्थळी जायला निघालो. मिस्टर फालोरोंच्या जीपमधून जाताना मला असं लक्षात आलं की, त्यांच्या पांढऱ्या जीपच्या बंपरचा डावा भाग, कशाला तरी जोराने घासला गेल्यामुळे तिथला रंग उडाला होता.

थोड्या वेळाने मी आणि मि.फालेरो घटनास्थळी पोहोचलो. मी निरीक्षणाला सुरुवात केली. पण काहीच सुगावा लागला नाही. हताश होऊन मी मि. फालेरोंबरोबर जीपकडे जायला निघालो. मि. फालेरोंनी पुढे जाऊन जीप चालू केली. माझ्या मनातलं विचारचक्र चालू होतं की बहुधा अशी पहिलीच केस होती की, जी मी सोडवू शकलो नाही. माझ्या आयुष्यामध्ये-नोकरीमध्ये असा पहिलाच प्रसंग असेल.

इतक्यात माझे लक्ष समोरच्या चिंचेच्या झाडाकडे गेले. त्या चिंचेच्या झाडाला खोडाला काहीतरी घासलं



जाऊन पांढरा रंग लागला होता.

माझ्या डोक्यात एकदम प्रकाश पडला. सर विल्सनचे शव मिळाले. त्या जागेपासून ते झाड जवळच होते. मी हळूच एक चोरटी नजर मि.फालेरोंच्या जीपच्या बंपरकडे टाकली आणि मनात संशय घेऊन गाडीत बसलो.

परतल्यावर मी माझं काम वेगानं सुरू केलं. माझ्या सहकाऱ्याबरोबर मी दुसऱ्या दिवशी पुन्हा तिथे गेलो. त्या चिंचेच्या झाडावर खूण करून ठेवली त्या झाडावर जी घासल्याची खूण होती तिची जमिनीपासूनची उंची मी मोजली. तिथे लागलेल्या पांढऱ्या रंगाचे नमुने घेतले आणि नंतर मी फालेरोंच्या नकळत त्यांच्या गाडीला जी घासल्याची खूण होती, तिची जमिनीपासूनची उंची मोजली आणि त्यांच्या गाडीच्या रंगाचे नमुने घेतले. निकाल-दोन्ही रंगाचे नमुने आणि उंची, या दोन्ही गोष्टी तंतोतंत जुळत होत्या. आता काम एकदम सोपं झालं असं वाटलं, पण कोर्ट हे पुरावे मानणार नव्हतं. त्यामुळे अजून भक्कम पुरावे गोळा करावे लागणार होते. पण तेही लवकर मिळाले.

मी फालोरोंची गाडी ताब्यात घेतली आणि तपासणी केली. अजून एक पुरावा मिळाला तो म्हणजे गाडीच्या मागच्या बाजूला काही चिंचा आणि



**उपचारापुरतेच प्रश्न साधे एक-दोन। त्यांच्या दरम्यान उभे अवघडलेले मौन।।**

'सुने हुए को मनन करो, मनन करनेसे शक्तिशाली बनोगे।'

त्या चिंचेच्या झाडाचा पालापाचोळा मिळाला.

पण तरीही काम झालं नाही, कारण शहरात अशी लाखो चिंचेची झाडं होती. मग या चिंचा नेमक्या त्या धडक झालेल्या झाडाच्याच; हे कसे सिद्ध करणार?

आता नशीबानेच माझा हात धरला होता. अचानक माझ्यातला जीवशास्त्रज्ञ जागा झाला आणि मला एक युक्ती सुचली. प्रत्येक सजीवाची एक जैविक खूण असते आणि ती प्रत्येकाची कधीही एक सारखी नसते. ती खूण म्हणजे 'डी.एन.ए.' (DNA-Dioxy Nucleic Acid)

मी प्रख्यात DNA अभ्यासक डॉक्टर विल्यम्स यांना भेटलो. त्यांना केसमध्ये मदत करण्याबद्दल विनंती केली. मग मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी घटनास्थळावरील सर्व चिंचेच्या झाडांचे नमुने गोळा करून



डॉ. विल्यम्स यांना दिले. त्यांचा होकार ही आमच्यासाठी एक महत्त्वपूर्ण गोष्ट होती. त्यांनी खूप मेहनत घेऊन सर्व नमुन्याचे DNA काढले; व फालोरोंच्या जीपमध्ये सापडलेल्या चिंचा या अपघाती झाडाच्याच आहेत हे सिद्ध केले.

नंतर एका केमिस्टने मि. फालोरोंनी २६ सप्टेंबरला आर्सेनिक व अॅन्टी पॉयझनिक विकत घेतल्याची साक्ष स्वत: येऊन दिली.

यानंतर मला सगळा प्रकार समजला आणि मी अभिमानाने सांगू शकतो की ही केस मी अत्यंत सुंदर पद्धतीने सोडवली होती.

मी सर्वप्रथम मि. फालोरोंना भेटलो आणि म्हणालो,

"Wow, Biochemist, very clever, but not more than me!"

खूप हुशारी दाखवलीस, दिनांक २८ सप्टेंबर रोजी सर विल्यम्सना स्वत:च्या कारने एका व्यावहारिक कामासाठी म्हणून घेऊन निघालास. मग वाटेत त्यांना जबरदस्तीने विष पाजायला सुरुवात केलीस. त्यात तुझी जीप चिंचेच्या झाडावर आपटली. मग सर विल्यम्स बचावासाठी जीपचे दार उघडून बाहेर पळाले. तूही त्यांच्या मागे गेलास आणि त्यांच्याशी झटापट केलीस. तू त्यांना विष पाजण्यात सफल झालास आणि वरून त्यांच्या शरीरात आर्सेनिक सापडलं, तर आम्हाला सुगावा लागेल म्हणून विषाचे कण मिटवण्यासाठी सरांना अँटी पॉयझनिक पाजलंस. पण सरांचे प्राण आधीच गेले होते. त्यामुळे ते सरांना वाचवू शकले नाही. पण शरीरातील विषाचे कण नष्ट करण्याचे काम त्या अँटी पॉयझनिकने चोख पार पाडलं!

वा रे वा! खूपच हुशार! काय प्लॅन आहे? अरे पण मूर्खा तुला एवढं कसं कळू नये, जितक्या प्रमाणात आर्सेनिक देशील तितक्या प्रमाणात अँटी पॉयझनिक द्यायचं होतंस; म्हणजे जर तू ७ ग्रॅम आर्सेनिक दिलंस आणि १० ग्रॅम अँटी पॉयझनिकने ते नष्ट करण्याचा प्रयत्न केलास तर अँटी पॉयझनिकने आर्सेनिकचे ७ ग्रॅम नष्ट होतील. पण उरलेलं अँटी पॉयझनिक त्याच, म्हणजे अँटी पॉयझनिकच्याच स्वरूपात डॉक्टरांना शवविच्छेदनात ३ ग्रॅम सापडतील हे तुला कळू नये? म्हणतात ना, खुनी कितीही हुशार असो, तो एकतरी पुरावा मागे सोडतोच'' असो. हे ऐकल्यावर मात्र मि. फालोरोंनी माझं कौतुक करून आपल्या आणि सरांच्यामधील संबंध कुणालाच माहीत नाहीत याचा फायदा घेऊन खुनानंतर धंदा स्वत: हडप करण्याची इच्छा असल्याचे कबूल केले.

केस कोर्टात गेली आणि निकाल अर्थातच आमच्या बाजूने लागला. अखेर २ एप्रिल १९८५ ला केस पूर्ण सुटली आणि तब्बल ६ महिन्यानंतर मी खुन्याचा शोध लावल्याच्या आनंद घेऊ शकलो.

मि. फालोरोंना फाशीची शिक्षा झाल्याचं कळल्यामुळे, दुसऱ्या दिवशी मिसेस विल्सन मिठाईचा बॉक्स घेऊन माझ्याकडे आल्या आणि धंदा पुढे स्वत: चालवणार असल्याचं त्यांनी सांगितलं. मी मिठाईचा तुकडा तोंडात टाकून हसत म्हटलं, 'असिस्टंटपासून सावध राहा म्हणजे झालं!'

***

**चि.रोहित पांढारकर, वैभव जागुष्टे**
(इ. ८ वी)
**'विज्ञानकथा विश्व'**
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, पुणे.
**चित्रकर्ती :** वल्लरी मोरगावकर (९ वी)

**समजून घेत असताना समजूतही घालता येते, नंतर आपोआप हळूहळू सारे उलगडत जाते**

'सदा शान्त स्वरूप मे स्थित रहो।'

# कविता पानोपानी



## ढगांशी गप्पा

ढगदादा, ढगदादा येतोस का?
इकडे येऊन मला भिजवतोस का?

पावसात भिजलो तर आई देते मार,
सारखा पळतोस, दमतोस फार

रोज रोज नवीन ड्रेस घालतोस तू,
कधी पांढरा, कधी काळा, आवडतोस तू!

तुझ्यावर बसून मला फिरायचेय लांब;
आई मला सोडत नाही, देते फार काम.

**– चि. सुयोग अबनावे,** (६ वी)
अ–६३४, आय.पी.सी.एल.टाऊनशीप,
नागोठणे, जि.–रायगड.

**चित्रकर्ती : केतकी सावरगावकर** (१० वी)




मंदिरातल्या महापूजेतून, मशिद, गिरजा, गुरुद्वारातून, शांतीचे संदेश येऊ दे, या सृष्टीवर प्रेम फुलू दे

# अहंकार

शून्य म्हणाले अंकाला, ‘‘माझ्याशिवाय तुझे अडेल,
मी जवळ नसलो तर तुझी किंमत कशी वाढेल?’’

अंक झाला हिरमुसला करू लागला विचार,
शून्याचा गर्व घालवायला घ्यावा कोणाचा आधार?



डाव्या हाताने अंकाला हळूच काही खुणावले,
आत्ता कोठे अंकाचे मन जरा सुखावले.

दुसऱ्या दिवशी शून्य जरा तोऱ्यातच गणितात आले;
डावीकडील खुर्ची पाहून, नामोहरम अगदीच झाले.

**– कु. स्नेहा गोडबोले,**
**‘स्वानंद’** गोगटे क्लास,
पेण, जि. रायगड

# कविता पानोपानी



## मूल्यांचा फेर

अशी मूल्ये सुरेख बाई, जपूनी ठेवावी
जपूनी ठेवावी, बाई आचरणी आणावी

भोवतालची सुखदु:खे जाणूनी हळूवार व्हावे
संवेदना जागवूनी प्रसन्न भावनेत जगावे ।।१ ।।

विवेक ठेवूनी शिष्टाचारांनी सुसंवाद साधावे
सौजन्याने मानवी संबंधांना माधुर्य आणावे ।।२ ।।

देशभक्तांना वंदूनी आदराने झुकावे
थोर नेत्यांच्या प्रेरणेने राष्ट्रभक्तीला भजावे ।।३ ।।

सर्व धर्मांच्या तत्त्वांना निष्ठेने पूजावे
सर्वधर्मसहिष्णुतेने राष्ट्र समर्थ करावे ।।४ ।।

विविध संस्कृतींच्या वारशाला जतन करावे
सुरस परंपरेतून राष्ट्रीय एकात्मतेला जपावे ।।५ ।।

मुलगा-मुलगी हे अनिष्ट भेद टाळावे
समानतेतुनी निकोप विकासा साधावे ।।६ ।।

सहकार्य करूनी श्रमण्यातल्या आनंदा लुटावे
श्रमाला मूल्य देऊनी श्रमसंस्कार रुजवावे ।।७ ।।

निसर्गचक्रात फिरूनी कार्यकारण शोधावे
अंधश्रद्धेला दूर ठेवूनी विज्ञान दृष्टिकोन ठेवावे ।।८ ।।

सौंदर्यदृष्टीने जीवनातील रसास्वाद घ्यावे
नीटनेटकेपणातुनी व्यक्तित्त्वाला पैलू पाडावे ।।९ ।।

वेगवान युगाशी इष्ट समन्वय घ्यावे
वक्तशीर राहूनी भविष्यातील अनर्थ टाळावे ।।१० ।।

अशी मूल्ये सुरेख बाई, जपूनी ठेवावी ।
जपूनी ठेवावी, बाई आचरणात आणावी ।।

***

**- कु. भावना पटवर्धन** (इ. ९ वी)
**'कस्तुरी'**, न्यू इंग्लिश स्कूल, सातारा.
**चित्रकार :** विराज नारळकर, (८ वी)



मंदिरातल्या महापूजेतून, मशिद, गिरजा, गुरुद्वारातून, शांतीचे संदेश येऊ दे, या सृष्टीवर प्रेम फुलू दे

# केशवसुत स्मारकामधील भारावलेपण

– चि. श्रेयस उकिडवे

*'नव्या मनूतील नव्या दमाचा*
*शूर शिपाई आहे।*
*कोण मला वठणीवर आणू शकतो*
*ते मी पाहे।।''*

मराठीतील क्रांतिकारक कवी अशी आपणाला ज्यांची ओळख आहे ते म्हणजे मालगुंडचे 'कृष्णाजी केशव दामले ऊर्फ केशवसुत.' मालगुंडचे अशासाठी कारण त्यांचा जन्मच मुळी मालगुंडमध्ये झाला. अनेक क्रांतिकारी कविता लिहून अंधारात चाचपडणाऱ्या मराठी मनांना जागं करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. कविता हे लोकजागृतीचे अत्यंत प्रभावी माध्यम असते. परंतु त्यासाठी कवीचे शब्दही तितकेच महत्त्वाचे असतात.

अशा या थोर क्रांतिकारक कवीची आठवण म्हणून, कोकण मराठी साहित्य परिषदेने त्यांच्या जन्मस्थानी म्हणजे मालगुंडमध्ये केशवसुतांचे स्मारक उभारले. मी पहिल्यांदा जेव्हा त्या स्मारकात गेलो तेव्हा तेथील सौंदर्य पाहून खरोखर तृप्त झालो. आता तुम्ही म्हणाल, ''एवढे काय आहे तेथे?'' मी पहिल्यांदा गेल्यावर मला तेथे जे काही दिसले ते मी तुमच्या डोळ्यांसमोर उभे करतो. मी भल्या मोठ्या प्रवेशद्वारातून आत गेलो. मला समोर दिसले ते केशवसुतांचे घर.

केशवसुतांच्या जुन्या घराची सुधारित आवृत्ती येथे उभी आहे,

*प्राप्तकाल हा विशाल भूधर,*
*सुंदर लेणी तयात खोदा।*
*निजनामें त्यावरती नोंदा,*
*बसुनी कां वाढविता मेदा*
*विक्रम काही करा, चला तर!*



असे जे केशवसुतांनी म्हटले आहे त्याचा प्रत्यय मला हे स्मारक पाहाताना आला. काव्यरुपाने त्यांनी आपले नाव कालाच्या भूधरावर कोरून ठेवले आहे हे खरेच! म्हाताऱ्या झालेल्या घराला तरुण करण्याचा हा एक प्रयत्न. घरासमोर शेणाने सारवलेले अंगण. घरात प्रवेश केल्यावर तुम्हाला दिसेल तुमचे स्वागत करणारा व बसण्यासाठी जागा देणारा झोपाळा. तेथेच समोर दिसतील एखाद्या पहारेकऱ्यासारखे उभे असणारे दोन खांब. कोकणातील पडव्यांची कल्पना प्रत्यक्षात उतरवलेली दिसेल. ओटीवर केलेली खुंट्यांची रचना, माजघरातील लोट्यांची आणि कोनाड्यांची रचना अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे.

डाव्या कोपऱ्यात बांधलेले न्हाणीघर. मागच्या पडवीत स्वयंपाकघर. त्याच्या उजव्या बाजूला बाळंतिणीची खोली– एक अंधार खोलीच जणू. मागच्या दारी सुंदर तुळशी वृंदावन. केशवसुतांनी आपल्या कवितांनी विश्वातील अंधार दूर केला, पण आपल्या घरातील अंधार ते कसे दूर करू शकणार? मात्र त्यासाठी आता झरोक्यांची रचना केलेली आहे. घराच्या सभोवती केलेली फुलझाडांची लागवड, फुलांनी बहरलेली ती झाडे पाहून मन प्रसन्न होते. अगदी कविता वाचून होते ना तसे!

हे सर्व पाहिल्यावर केशवसुत अजूनही तेथेच राहात आहेत, असा जणू आभास मला झाला. या घराचे पूर्वीच स्वरूप तसेच आहे. फक्त मातीच्या ठिकाणी सिमेंट–क्राँक्रीटचे घर आहे. म्हणजे शरीर तेच, फक्त मळलेला शर्ट काढून त्यावर नवीन शर्ट घातलेला आहे. आता आपण आणखी थोडे पुढे जाऊ. तिथे आहे काट्यांनी भरलेली गुलाबाची बाग. ती पाहताना मला त्यांच्या पुढील ओळी आठवल्या.

*पूजितसें मी कवणाला?*
*तर मी पूजी आपुल्याला।*
*आपल्यामध्ये विश्व पाहुनी*
*पूजितसे मी विश्वाला।।*

त्यानंतर समोर आले ते स्मारकाचे अवाढव्य नसलेले परंतु

**काट्यांवाचुनि गुलाब नाही हे धर हृदयी साच; नैराश्याचा मग तुजला तो होइल न कधी जाच.**

छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !

रेखीव बांधकाम! प्रवेशद्वारी नीलकमळाने माझे स्वागत केले.

मध्यभागी उभारलेला केशवसुतांचा चैतन्यमय पुतळा माझ्या सर्व हालचाली पाहात होता. म्हणून कधी नव्हे ते हसत-हसत मी आत गेलो. मी प्रथम डाव्या बाजूला असलेल्या सभागृहात गेलो. तिथे तर मी अक्षरश: थक्क झालो. मराठीतील सर्व नामांकित कवींच्या कविता तेथे होत्या. ते कवी ठराविक हावभाव करून माझी विचारपूस करत होते. मी सर्व कविता वाचून काढल्या. मी कवितेच्या साम्राज्यात अगदी रममाण झालो होतो.

आता मी गेलो उजव्या बाजूला असलेल्या सभागृहात. हे होते वाचनालय. येथे सुमारे ३५०० पुस्तके आहेत, असे मला तेथे एका व्यक्तीने सांगितले. ज्ञानेश्वरीसारख्या अजरामर ग्रंथांपासून एका दिवसाचे आयुर्मान असणाऱ्या वर्तमानपत्रांपर्यंत, वैचारिक साठ्यांचे सर्व प्रकार मला तेथे आढळले. मी काही पुस्तके पाहिली; हाताळली. अतिशय सुंदर आणि निवडक पुस्तके तेथे होती. मग मी गेलो स्मारकाभोवती असलेल्या निसर्गरम्य प्रदेशात. एखाद्या सम्राटाच्या डोक्यावर ज्याप्रमाणे छत्र असते त्याप्रमाणे त्या स्मारकाच्या मस्तकावर म्हणजेच छपरावर माडाच्या झाडांचे एक छत्रच तयार झालेले होते. फरक एवढाच की, त्या सम्राटाचे छत्र त्याच्या दासांनी बनविले होते. मात्र या केशवसुत सम्राटाचे छत्र निसर्गाच्या पूजकांनी बनविले होते.

मी वरती नारळांनी लगडलेल्या माडांकडे पाहिले. माझ्या मनात मलाच कोणीतरी सांगू लागले, 'कोणी जरी या परिसरातील फुले तोडण्याचा, झाडे तोडण्याचा किंवा परिसराची नासधूस करण्याचा प्रयत्न केला तर

*जिकडे जावे तिकडे*
*माझी भावंडे आहेत,*
*सर्वत्र माझ्या घरच्या*
*खुणा मजला दिसताहेत।*

असा आवाज ऐकू येईल.

माडावरील एखादा नारळ टणकन डोक्यात पडून त्याचा कपाळमोक्षच होईल.ते नारळाचे वृक्ष पाहाताना असं वाटलं जणू केशवसुतांच्या कविता ऐकण्यासाठी माड किंचित खाली झुकलेले होते.

गर्द झाडीतून वाट काढणारी केशवसुतांच्या दर्शनास आतुरलेली सूर्यकिरणे, त्यातच माणसांनी केलेली गर्दी, कोणी फोटो काढतो आहे तर कोणी चित्र, कोणी कविता वाचत आहे तर कोणी पुस्तके. मी मात्र एकलकोंड्याप्रमाणे एका कोपऱ्यात बसून माझ्या चार डोळ्यांनी (म्हणजे चष्मा आणि दोन डोळे) त्या परिसराचा पुरेपूर आनंद लुटत होतो.

मला त्या सर्व चेहऱ्यांमध्ये केशवसुतांचा पुतळा अधिक तेजस्वी वाटत होता. जगताना आणि मरणानंतरदेखील कसे तेजाने जगावे याची साक्षच तो जणू देत होता! दुपारचे बरेच कितीतरी वाजले होते. झाडांच्या सावल्या अधिक दाट होत होत्या. 'झाडे उन्हे सोसू देत आपण सावल्या उपभोगूया' असे मनातल्या मनात म्हणत (कारण मोठ्याने म्हटले असते तर झाडांनीही ते ऐकले असते ना!) तेथेच दहा मिनिटे बसण्याचा निर्णय घेतला.

एखाद्या देवळात गेलो की बाहेर पडण्याअगोदर आपण दहा मिनिटे तेथे बसतोच. मी देखील विचारांच्या, कल्पनेच्या देवळात आलेलो होतो आणि तेथेच बसण्याचा निर्णय घेतला. प्रसाद म्हणून नारळातील पाणी होतेच. त्याची गोडी काय वर्णावी?

शेवटी मी जड पावलांनी आणि जड अंत:करणाने बाहेर पडलो. मात्र बाहेर पडण्याआधी मी असा चंग बांधला की केशवसुतांसारख्या कविता करता आल्या नाहीत तरी चालेल, परंतु

*वाग्देवी गे! दे शब्दांते*
*भोवऱ्यात या फेकुनी,*
*त्याते जरा जाऊ दे निजधामाते,*
*नर मळविले अहह!*
*तेज ते पूर्वी होते जे त्यांत!*
*म्हणुनी शाप न आता मारी,*
*आशीर्वचही न आता तारी,*
*तर गर गर गर त्यास चढू दे*
*ताजे व्हाया स्वर्गात!*

– (केशवसुत)

त्यांच्यासम जीवन जगण्याचा, त्यांचे गुण आचरणात आणण्याचा आणि पारतंत्र्य कधीही सहन न करण्याचा प्रयत्न करीन. शेवटी मला असे म्हणावेसे वाटते–

*'डोंगर राजी दऱ्या-खोरी*
*घुमतो नाद हा त्यांचा।*
*त्या कवीचे नाव घेता*
*पवित्र होते वाचा।।'*

***

**– चि. श्रेयस उकिडवे** (इ. ९वी)
**'भावगंध'** फाटक हायस्कूल,
रत्नागिरी.



**दिवस सुगीचे सरले, आता फार उन्हाळा तावे, उघड्या नांगरलेल्या रानी मृगजळ गोड दिसावे**
छात्र प्रबोधनला हार्दिक शुभेच्छा !

## सुट्टीतील छंद

# खोडरबरांचा संग्रह

-कु. सुप्रिया व सचिन भुर्के



**शा**ळेत असताना आम्हाला वेगवेगळ्या वस्तू जमवण्याचा छंद होता. कधी वेगवेगळ्या रंगाच्या व डिझाईनच्या टाईल्स तर कधी काडेपेटीचे छाप, कधी स्टँप तर कधी नाणे. पण या सर्वांची क्रेझ थोड्या दिवसांनी कमी झाली आणि एका वस्तूचा संग्रह करण्याचे मी व माझ्या भावाने निश्चित केले. ती वस्तू म्हणजे 'खोडरबर'- जे तुम्हाला आम्हाला सगळ्यांनाच सारखं लागत असतं; आणि छान सुगंधाची, रंगांची व विविध आकारांची खोडरबरं कुणाला आवडणार नाहीत साठवायला?

हा संग्रह करायला आणखीही एक कारण घडले. पुण्याच्या केळकर संग्रहालयाचे संचालक मातीचे दिवे जमवत होते. त्यावेळी बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे माझ्या वडिलांनी मातीचे दिवे त्यांने नेऊन दिले. बोलता-बोलता केळकरांनी सांगितले की, संग्रह हा केवळ जुन्या वस्तूंचा करावा असे नाही तर आज जी वस्तू सहजरित्या उपलब्ध आहे अशा वस्तूंचा संग्रह केला, तरी ती काही वर्षांनी दुर्मिळ होते. ही महत्त्वाची गोष्ट लक्षात घेऊन आमच्या वडिलांनी आम्हाला खोडरबरांचा संग्रह करण्याची कल्पना सुचविली. खरंच! रबरांचे बाजारामध्ये रोज नवनवीन प्रकार येत असतात. तसेच जुने प्रकार थोड्याच दिवसात दुर्मिळ होतात. ही महत्त्वाची गोष्ट लक्षात घेऊन आमच्या वडिलांनी आम्हाला खोडरबरांचा संग्रह करण्याची कल्पना सुचविली. खरंच! रबरांचे बाजारामध्ये रोज नवनवीन प्रकार येत असतात. तसेच जुने प्रकार थोड्याच दिवसात दुर्मिळ होतात. रबर ही वस्तू लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांना आकर्षक वाटते. जागा पण कमी घेते आणि खिशाला देखील परवडते. मुख्य म्हणजे या वस्तूचा संग्रह आधी कोणी केला नव्हता आणि म्हणून आम्ही खोडरबरांचाच संग्रह करण्यास सुरुवात केली. पण हा संग्रह करण्याची कल्पना जेवढी सोपी वाटली तेवढं प्रत्यक्षात संग्रह करणे सोपं नव्हतं, हे आम्हाला हळूहळू जाणवायला लागलं. आम्हाला रबर जमवण्यासाठी खूप फिरावे लागले.

हा संग्रह आम्ही १६ मे १९८४ मध्ये सुरू केला आणि त्यानंतर त्याचे पहिले प्रदर्शनसुद्धा भरवले. बोरिवलीला मामाकडे गेलो असताना, चालत-चालत आम्ही सर्व स्टेशनरीची दुकाने पालथी घातली. प्रत्येक स्टेशनरीच्या दुकानात गेल्यावर आम्ही दुकानदाराला रबर दाखवायला सांगायचो. तो एखाद-दुसरा प्रकार दाखवे. मग आम्ही अजून काही प्रकार दाखवायला सांगितले की, तो वैतागत असे. मग आमचा उद्देश त्याला समजावून सांगितल्यावर तो उत्साहाने स्वतःहून रबरांचे वेगवेगळे प्रकार दाखवत असे.

अशा प्रकारे आम्ही मुंबई, पुणे, अमरावती, सोलापूर, नगर, सातारा, सिंगापूर, मनाली, दिल्ली अशा ठिकाणांहून रबरं आणली. वर्गात माहिती झाल्यावर मुलं रबरांची अदलाबदल करायची. तसेच ओळखीचे लोक बाहेरगावी गेले तर आमच्यासाठी वेगवेगळी

रबरं आणत.

या संग्रहाचे २०-२२ गट केले आहेत. जसे पक्षी, प्राणी, फळं, फुलं, वाहने, विद्युत उपकरणे, खाद्यपदार्थ, पत्ते, राशी, माणसांचे प्रकार, घरं, सौंदर्य प्रसाधने, रामायण, महाभारत, ऑलिंपिक, एशियाड सिरीज इ.

प्राण्यांमध्ये वाघ, उंट, हत्ती, घोडा, कासव इ. पक्ष्यांमध्ये कोंबडी, गरुड, बदक, चिमणी इ. फळांमध्ये केळी, पेरू, सफरचंद, फुलांमध्ये गुलाब, विद्युत उपकरणांमध्ये मिक्सर, पंखा, बल्ब, वाहनांमध्ये ट्रेन, कार, विमान, खाद्यपदार्थांमध्ये आईस्क्रिम, बर्गर, फँटा, पेप्सी, लिम्का बॉटल्स तसेच पत्ते, राशी यांची सिरीज.

आत्तापर्यंत आम्ही या संग्रहाचे प्रदर्शन रोटरी, लायन्स, जेसिस क्लब, बँक ऑफ महाराष्ट्र व इतर संस्थांमधून व गणपती उत्सवांमधून भरवली आहेत.

हे प्रदर्शन अधिक आकर्षक होण्यासाठी सोबत साजेसे सुविचार मांडले जातात. उदा. ट्रेनजवळ- "Short cut will cut you short" ससा आणि कासव यांच्याजवळ - "Slow and steady wins the race" फोनजवळ - "Be short you will be wanted by others" जाड्या-रड्याच्याजवळ- ''मोटोंको सलाह- रूको. मत खाओ.'' पतलोंको सलाह- ''रूको मत. खाओ.'' अशी वाक्ये मुद्दाम आम्ही लिहितो.

या रबरांमध्ये काही रबर बहुउद्देशीय आहेत. त्यांचा वापर खोडण्याव्यतिरिक्त पेपर-वेट, सेंटर पीस म्हणून होतो. काही सुटी रबरं असतात, तर काही प्लॅस्टीकच्या वेष्टनांमध्ये असतात. खोडरबरांबरोबर शार्पनर, ब्रश, पट्टी या गोष्टीदेखील काही वेळा असतात. बंदूक, गाडी या सारखी रबरं खेळणी म्हणूनही वापरता येतात.

रबर हे विशेषत: शाळेतील लहान मुलांचे आकर्षण असते. लहान मुलांचे लाड, हट्ट सर्वच आई-वडील पुरवत असतात. रबरांच्या आकर्षणामुळे रबरांचा हट्ट मुलं आई-वडिलांजवळ धरतातच. म्हणूनच रबराचे रोज असंख्य नवे प्रकार बाजारात येतात. तसेच जाहिरातीचे एक माध्यम म्हणून रबराचा वापर केला जातो. उदा. लिम्का कंपनीने स्वत:चे रबर काढले आहेत. कॅडबरीबरोबर तसेच दिसणारे रबर मोफत दिले जात होते.

रबराच्या माध्यमातून आपल्या जगातील ताज्या घडामोडींचे दर्शन होते. ऑलिंपिक, एशियाड स्पर्धांच्या वेळेस त्या-त्या सिरीजची रबरं बाजारात हजर झाली. 'अमर अकबर अँथनी' हा चित्रपट हीट झाला आणि लगेच त्याचे मोठे रबर निघाले.

अशा या रबरांचे प्रदर्शन भरवले जाते तेव्हा लहान मुलांना आवरणं अवघड होतं. रबर हातात घेऊन बघायचं आणि मग ते पाहिजेच म्हणून हट्ट धरायचा. काही वेळा पालकही ही विक्रीसाठी का नाही ठेवली म्हणून विचारू लागतात! मग त्यांना समजावणं अवघड काम असतं.

अमरावतीला आमच्या घरी चोरी झाली. चोराने रबरांची बॅग उघडून रबरं सर्वत्र फेकली. पण त्याला तो प्रकार काही कळला नसावा. तो सर्व रबरं तिथेच टाकून गेला. म्हणूनच हा संग्रह अजूनही सुरू आहे.

जवळजवळ गेली १६ वर्षे आम्ही हा संग्रह जमवून आहोत. जमवतो आहोत. या संग्रहाची नोंद 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस् ९४' मध्ये झाली आहे. 'किलबिल' कार्यक्रम, तसेच सोलापूर रेडिओवरून या संग्रहाची माहिती आम्ही दिली. अनेकांना आमच्या या संग्रहाबद्दल कुतूहल, उत्सुकता आहे. हा संग्रह, प्रदर्शने बघायलाही मुलं व पालक आवर्जून येतात. म्हणून तर आमचाही उत्साह टिकून आहे.

या संग्रहासाठी घरच्या सर्वांची खूप मदत झाली. तसेच ओळखीच्या लोकांनी देखील प्रोत्साहन दिले. 'कॅम्लीन' कंपनीने रबरचे गिफ्ट पार्सल पाठवले. 'डी.एस.के.' कंपनीने अभिनंदनाचे पत्र पाठवले. 'पोरे ब्रदर्स' ॲड एजन्सी (ऑल द बेस्ट ॲड्स फेम) यांनीही पत्र पाठवले.

सगळ्यांच्या अशाच प्रोत्साहनामुळे आजही हा संग्रह सुरू आहे. तुम्हालाही हा किंवा अशाप्रकारचा संग्रह करण्यासाठी खूप शुभेच्छा!

***

**- कु. सुप्रिया व सचिन भुर्के**
४, महालक्ष्मी, गणेशनगर,
एरंडवणे, पुणे - ४

**चित्रकार :** विराज नारळकर, (८ वी)



# फिरकी

– कु. प्राजक्ता सपकाळ

**आ**ता आपण २१ व्या शतकात पदार्पण केले आहे व आपण साध्या विज्ञानयुगात वावरत आहोत, तरीपण खरं सांगा मनातल्या कोणत्यातरी कोपऱ्यात भुताची भीती असतेच ना? ही एक भुताचीच भयानक गोष्ट आहे.

मला संगीताची फार आवड. स्टेज शो करायला आवडतात. मी कितीतरी शो करतो; तर एकदा मला असेच एका स्टेज शोसाठी आमंत्रण आले, कोळशेवाडीत. कार्यक्रम पाच वाजता होता. मी साडेचारला तिथे पोहोचलो. पण नेहमीप्रमाणे कार्यक्रम सुरू होईपर्यंत पावणेसहा वाजले. कार्यक्रम छानच झाला. कार्यक्रम संपल्यावर मी लगेच निघणार होतो. पण नंतर थोडा वेळ तिथल्या माणसांशी गप्पा मारत चहा-पाणी चालू होते.

इतक्यात मला कोणीतरी निरोप दिला की, तुम्हाला ताबडतोब घरी बोलावलंय. मला कळले काही तरी गंभीर गोष्ट आहे, त्याशिवाय घरून असा निरोप येणार नाही. मी लगेच परतायला तयार झालो. ड्रायव्हरला गाडी काढायला सांगितली. पण गाडी सुरूच होईना. या गाडीलाही नेमकं आत्ताच बिघडायचं होतं. जसा जसा मधे वेळ जाऊ लागला तसं तसं मी जास्तच अस्वस्थ झालो. अंधारामुळे ड्रायव्हरला नेमका दोषही बघता येईना. शेवटी गाडीची आशा सोडून मी पायीच निघायचे ठरवले. वाटेत कुणाकडून लिफ्ट मिळाली तर बघावी असाही मी विचार केला. त्यावेळी आठ वाजून गेले असावेत. मी निघणार तेवढ्यात ती माणसे म्हणाली, 'अहो पाव्हणे, आता रात्र झाली. यावेळी गावाबाहेर पडणं ठीक नाही.' एकजण म्हणाला, 'गावाबाहेर मोठं स्मशान आहे व त्यात भुते आहेत. तेव्हा तुम्ही सकाळी लवकर उठून निघा.' मी लोकांना खूप समजावले व माझ्याबरोबर कुणालातरी पाठवायला सांगितले, पण छे हो! कोणीही यायला तयार झाले नाही. मी विचार केला, एवढा तातडीने निरोप पाठवलाय म्हणजे नक्कीच काहीतरी महत्त्वाचे असणार व आपल्याला गेलेच पाहिजे.


शेवटी कोणालाही बरोबर न घेता मी एकटाच निघालो. तसा मी भुताबिताला घाबरत नाही बरं का. पण गावकऱ्यांचे ऐकल्यामुळे थोडी भीती वाटत होती. थोड्या वेळाने मी गावाबाहेर पडलो व कच्च्या रस्त्यावरून जात होतो. रस्त्याच्या दोन्हीही बाजूंना माळ पसरला होता. म्हणजे ती स्मशानभूमी होती. रस्त्यांवरच्या दिव्यांशिवाय आजूबाजूला कुठेच दिवा नव्हता. कुत्री भुंकण्याच्या आवाजाशिवाय दुसरा कसलाही आवाज येत नव्हता. मला एकसारखे त्या गावातील माणसांचे बोलणे आठवत होते. मी एकदाचा तो कच्चा रस्ता संपवला व हायवेवर आलो. मला मध्येच कुणीतरी मागून येत असल्याचा तर मध्येच हळूहळू बोलण्याचा आवाज येई. हायवेवरही जास्त रहदारी नव्हती. पण अधून-मधून गाड्या येत-जात होत्या. येथून एखाद्या गाडीतून आपल्या गावी जावे, असा विचार करून मी तिथेच थांबलो. समोरून गाडीचे दोन हेडलाईट माझ्याकडे येताना दिसले. मी माझे सामान घेऊन तयार झालो. गाडी जवळ येताच तिला थांबविण्यासाठी मी हात केला. गाडी थांबली नाही. दोन-तीन गाड्या अशाच गेल्या. आता मी ठरवले रोडच्या मध्यभागी जाऊन उभे राहायचे. पुन्हा समोरून एक गाडी आली. मी रोडच्या मध्ये जाऊन उभा राहिलो, मला वाटले आता गाडी थांबणार. पण छे! गाडी तर माझ्या बाजूने निघून गेली. मी अगदी निराश झालो. आता रात्र वाढत होती. मलाही खूपच झोप येऊ लागली होती.

बऱ्याच वेळाने पुन्हा एक गाडी आली. मला वाटले ही पण निघून जाणार. तरी पण मी हात केला आणि ती गाडी थांबली. मी चटकन आत गेलो. मला क्षणभर आनंद झाला. पण जेव्हा मी नीट लक्ष देऊन पुढे पाहिलं तर गाडीत ड्रायव्हरच नव्हता.

मी गोंधळलो, घाबरलो. गाडी तर पुढे पुढेच जात होती. नंतर माझ्या शेजारच्या खिडकीच्या काचेतून मला फक्त एक हात दिसला. माझ्या तर तोंडचे पाणी पळाले. सर्वांगाला



**गडद जाहल्या रंग पश्चिमा, लाल निळी जांभळी। वृक्षांच्या सावल्या मिसळल्या, संथ हालत्या जळी।।**



दरदरून घाम फुटला. मी त्या गाडीतून खाली उडी मारली व तेथून पळतच सुटलो. थोड्या अंतरावर गेल्यावर मला एक झोपडी दिसली. मी तिथे गेलो. झोपडीतही कोणीच नव्हते. पण गाडीच्या अनुभवाने मी इतका घाबरलो होतो की संपूर्ण रात्र मी तिथेच काढली. मनात येऊन गेलं कोळसेवाडीतच रात्र काढली असती तर बरं झालं असतं. मी सकाळी उठून बाहेर आलो. पाहतो तर काय समोर हायवेवर तीच रात्रीची गाडी व एक मनुष्य त्या गाडीला टेकून दात घासत होता. मी त्याला सांगितले, ''अहो या गाडीपासून दूर व्हा. ही काय साधी गाडी नाही, भुताची आहे.'' त्या मनुष्याने आश्चर्याने विचारले ''म्हणजे काय?'' मी त्याला रात्रीची हकीकत सांगितली तर तो मनुष्य रागाने म्हणाला, ''अरे वा! म्हणजे रात्री ही गाडी मी एवढ्या लांबून एकतर ढकलत आणली व मी घाम पुसायला थोडा वेळ थांबलो तर तेवढ्यात तू आत बसलास? तरीच गाडी थोडी जड झाल्यामुळे मला फार पुढे ढकलता आली नाही आणि तू मात्र आरामात बसला होतास!'' त्या माणसाचे हे बोलणे ऐकून मी डोक्यालाच हात लावला. इतका मी झोपेत होतो का? की भीतीने त्यावेळी मला तसे वाटले. रात्रीचा सारा प्रसंग आठवून आता मला चांगलेच खजील व्हायला होत होते, त्यावेळच्या परिस्थितीने माझी चांगलीच फिरकी घेतली; अगदी कायमची लक्षात राहील अशी!

❒ ❒ ❒

**– कु. प्राजक्ता सपकाळ,** (८ वी)
**'आनंदनगरी'**
अभिनव ज्ञान मंदिर, कात्रज
**चित्रकार :** विराज नारळकर, (८ वी)

---



## वात्रट पाण्यांची शाळा

वनात भरली एकदा प्राण्यांची शाळा
त्यात एकूण विद्यार्थी जमले सोळा

सिंह होता शाळेचा मुख्याध्यापक
ससा होता पी.टी.चा शिक्षक

माकड होते मराठी शिकवायला
त्याच शिकवण म्हणून जिराफ दूर पळाला

गायन शिक्षक म्हणून होती कोकिळा
गायनाच्या वेळी गाढव करत होते चाळा

बेडूक होता शिक्षक विज्ञानाचा
उंट होता शिक्षक भूगोलाचा

वाघ आणि सिंह सशावर धावले
शाळेत जमलेले प्राणी दूर पळून गेले

अशा प्रकारे प्राण्यांची शाळा एकच दिवस भरली
त्यानंतर घंटा न होताच प्राण्यांची शाळा सुटली



❒ ❒ ❒

**तारकापुंज, 'अग्रज्ञेय'**
चंद्रकांत पाटकर विद्यालय,
डोंबिवली (पू.), जि. ठाणे.
**चित्रकार : शौनक निवर्गी,** (५ वी)




**दिशाहीन जाहली वाट ही वळणावर थबकली। भयकंपित चाहूल कुणाची, शहारली आंधळी।।**

(संस्था परिचय)

# धुळ्याचे राजवाडे संशोधन मंदिर

- कु. शीतल भिरुड



**भा**रतात इतिहास संशोधनासाठी स्थापन झालेल्या ज्या काही मोजक्या संशोधन संस्था आहेत, त्यामध्ये धुळ्याची राजवाडे संशोधन मंडळ ही नामवंत संस्था आहे. किंबहुना असे म्हणता येईल की, केवळ धुळे शहराचेच नव्हे तर उभ्या खानदेशाचे भूषण म्हणजे राजवाडे संशोधन मंडळ होय. मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी असंख्य कागदपत्रे आणि हस्तलिखिते, इतिहासाचार्य राजवाड्यांनी अहोरात्र परिश्रम करून गोळा केली होती. त्यातील बहुतेक कागदपत्रे व हस्तलिखिते धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही आहेत. त्याशिवाय गेल्या काही वर्षात, सुमारे दहा हजार कागदपत्रे आणि चारशे हस्तलिखिते अप्रकाशित असून, संशोधनाचे कार्य या संस्थेत अविरतपणे चालू आहे. त्या दृष्टीने ही संस्था म्हणजे खानदेशाचे व महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र मानले पाहिजे.

इतिहासाच्या संशोधनासाठी सारे जीवन व्यतीत करणाऱ्या, इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या स्मरणार्थ ही संस्था उभारण्यात आली. आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात विश्वनाथ राजवाडे त्यांचे स्नेही, तात्यासाहेब भास्कर वामन भट यांचेकडे धुळ्यात वास्तव्यास आले. ते एकटेच होते. त्यांचा संसार म्हणजे कागदपत्रे व हस्तलिखिते यांनी भरलेल्या पेट्या. येथे राहून राजवाडे आपले इतिहास संशोधनाचे कार्य करीत होते. पण अचानक १९२६ मध्ये अतिरक्तदाबाच्या विकाराने ते आजारी पडले. त्यातच ३१ डिसेंबर १९२६ रोजी त्यांचा मृत्यू झाला.

राजवाड्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्नेही मंडळींनी, राजवाड्यांचे अपुरे कार्य पूर्ण करण्यासाठी व संशोधन यज्ञ चालू ठेवण्यासाठी ९ जानेवारी १९२७ रोजी इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ ही संस्था स्थापन केली. धुळ्यात मध्यवर्ती ठिकाणी टॉवर बागेजवळ, सरकारकडून ५००० चौ.फूट जागा प्राप्त करून, एक दुमजली अदहाय (fireproof) दगडी इमारत बांधण्यात आली. राजवाडे संशोधन मंदिर नामक या इमारतीचे ५ जानेवारी १९३२ रोजी विनोबाजी भावे ह्यांच्या अध्यक्षतेखाली, इंदूरच्या महाराणी इंदिराबाई होळकर यांनी उद्घाटन केले.

राजवाड्यांच्या संग्रही असलेली कागदपत्रे व हस्तलिखिते या इमारतीत ठेवण्यात आली. आज राजवाडे संशोधन मंडळाच्या या संग्रहात बरीच मोलाची भर पडली आहे. सुमारे ६००० हस्तलिखिते व ३०,००० कागदपत्रे मंडळाच्या संग्रही आहेत. हस्तलिखितांमध्ये बखरी, मध्ययुगीन काव्ये, ज्योतिषविषयक ग्रंथ, वैद्यक ग्रंथ, धार्मिक पोथ्या आहेत. अत्यंत दुर्मिळ हस्तलिखितांमध्ये महिकावतीची बखर, १०९ कलमी बखर, राधामाधव विलासचंपू इ. चा उल्लेख करावा लागेल. राजवाड्यांनी जमा केलेली २०,००० कागदपत्रे असून त्यांची विभागणी ९० दप्तरात करण्यात आलेली आहेत. त्यातील बहुतेक कागदपत्रे 'मराठ्यांच्या

इतिहासाची साधने’ या नावाखाली २२ खंडात राजवाड्यांनीच प्रकाशित केलेली आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची काही दुर्मिळ पत्रे मंडळाकडे आहेत. नंतरच्या काळात काळे दप्तर, वैद्य दप्तर, भट दप्तर, लोकहितवादी दप्तर, मूर्टी मोडव्याचे पुरंदरे दप्तर, राजे प्रतापसिंह यांचे दप्तर, नंदुरबार दप्तर इ. अनेक दप्तरांची मोलाची भर मंडळाच्या संग्रहात पडली.

राजवाडे संशोधन मंडळात संशोधन कार्य अव्याहतपणे चालू असून, मंडळाच्या ‘संशोधक’ त्रैमासिकातून अप्रकाशित कागदपत्रे व हस्तलिखिते प्रकाशित केली जातात. अलीकडे राजवाड्यांचे समग्र साहित्य, १३ खंडात राजवाडे मंडळाने प्रकाशित केले आहे. ‘मराठ्यांच्या इतिहासाची साधने’ हे राजवाड्यांनी प्रकाशित केलेले २२ खंड पुनर्प्रकाशित करण्याचा मंडळाचा आगामी प्रकल्प आहे. एम.फील व पी.एच.डी. च्या अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त अशा ग्रंथांचे ‘भा.वा. भट संदर्भ ग्रंथालय’ आहे. त्यात सुमारे ५००० संदर्भ ग्रंथ आहेत. अशा विद्यार्थ्यांना राहाण्यासाठी वासुदेवाश्रम नावाची छोटेखानी इमारत मंडळाच्या आवारात आहे. त्याशिवाय ‘मुक्तद्वार सार्वजनिक वाचनालय’ देखील मंडळ चालवीत आहे.

इतिहासाच्या साधनांमध्ये कागदपत्रांप्रमाणेच ताम्रपट, शिलालेख, नाणी, ऐतिहासिक वस्तूंचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. अशा वस्तूंचेही जतन व्हावे, म्हणून एक वस्तुसंग्रहालयही मंडळाने उभारले आहे. १९७७ मध्ये येथील सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब मुंदडा यांनी लोकवर्गणी जमा करून व खाजगी संस्थांकडून अनुदान प्राप्त करून, अनेकांच्या सहकार्याने वस्तुसंग्रहालयाची भव्य इमारत उभारली. वस्तुसंग्रहालयात खानदेश परिसरातील ऐतिहासिक अवशेष, शिल्पे, जुनी भांडी, ताम्रपट, शिलालेख, नाणी, कोरीव काष्ठशिल्प, आदिवासींचे दागिने व इतर वस्तू यांचे जतन करण्यात आले आहे. नुकताच नगर जिल्ह्यातील जामखेड येथील कै. गजाननराव भिडे यांचा वस्तुसंग्रहालय मंडळाकडे सुपूर्द करण्यात आले आहे.

आपण स्थापन केलेली राजवाडे संशोधन मंडळ ही संस्था, आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण राहावी म्हणूनच मंडळाचे संस्थापक भा.वा.भट यांनी १९३२ मध्ये ‘राजवाडे मंडळ पीपल्स को.ऑप. बँके’ची स्थापना केली. या बँकेच्या लाभांशाचा ठराविक हिस्सा दरवर्षी मंडळाला संशोधन प्रकाशनासाठी देण्यात येतो. अशाप्रकारे संशोधन कार्यासाठी नियमितपणे पैसा देणारी बँक देशात नाही. या अनुदानामुळेच मंडळाच्या संशोधन प्रकाशनाच्या कार्याचा पसारा वाढला. म्हणजे लक्ष्मी व सरस्वतीचे वास्तव्य येथे आहे, असे म्हणता येईल. मंडळाची दुर्मिळ अशी ४० प्रकाशने असून त्यात ‘ज्ञानेश्वर नीतीकथा’ राजवाडेलिखित लहान मुलामुलींसाठी लिखाण आहे. सगळ्यांनी आवर्जून एकदा तरी भेट द्यावी, अशीच ही संस्था आहे.

***

**– कु. शीतल भिरुड,** (इयत्ता ५ वी)
९८ आदर्श कॉलनी देवपूर, धुळे.

### ☺ हसा–हसा ☺

★ **सैनिक–** माझी तक्रार आहे सर?

**सर–** काय? बोल लवकर

**सैनिक–** येथील जेवणात रोज माती असते, सर.

**सर–** तू सैन्यात दाखल झालास ते मातृभूमीच्या रक्षणासाठी की जेवणात माती म्हणून तक्रार करण्यासाठी?

**सैनिक–** सर, आलोय तर मी मातृभूमीच्या रक्षणासाठीच. पण तिला खाण्यासाठी नक्कीच नाही.

* * *

**मग दोन द्या !**

★ **गिऱ्हाईक :** ही छत्री केवढ्याला हो?

**दुकानदार–** ८० रु.

**गिऱ्हाईक–** ३५ रुपयांना देणार का?

**दुकानदार :** फुकटच न्या.

**गिऱ्हाईक :** मग दोन छत्र्या द्या !

***

– कु. नेहा बाफना (८ वी)
ज्ञान प्रबोधिनी,
**नवनगर** विद्यालय निगडी, पुणे.

# पैज कोणी जिंकली?



– कु. मानसी जोशी

**शा**ळा सुटली... किरण घरी आला... हातपाय धुवून, खाऊन तो कोचावर बसला... त्या दिवशी तो कसला तरी विचार करीत होता. त्या विचारात तो इतका बुडून गेला की, बाहेर अंधार केव्हा पडला ते त्याला कळलंच नाही आणि आईच्या हाकेने त्याला एकदम जाग आली.

''अरे किरण, तिन्हीसांजेला दार असं सताड उघडं टाकून कसला एवढा विचार करतोयस?''

''गाडी रुळावर कशी आणायची त्याचा विचार करतोय मी.'' किरण तंद्रीतच बोलला.

''अरे, मग त्याचा विचार तू कशाला करतोस, त्याचा विचार करायला रेल्वे अधिकारी समर्थ आहेत.''

''अगं, मी राजबद्दल बोलतोय'' आणि किरण आईला राजबद्दल सांगू लागला...

...राज! अख्ख्या शाळेला माहीत असलेलं नाव! पण हे नाव मुलांना माहीत होतं ते फक्त दांडगाई, मारामारी अशाच गोष्टींसाठी! राज एका बड्या बापाचा मुलगा होता. त्यामुळे शाळेत त्याचा आधीच दबदबा आणि त्यातून त्याचं हे असं वागणं. त्याने कोणतीही चूक केली तरी त्याचे वडील ती चूक आपल्या प्रतिष्ठेसाठी सावरून घेत असत.

...राजला पैज लावायची खूप सवय होती. जरा काही विषय मिळाला की, तो लगेच पैज लावत असे. एखाद्या निबंध स्पर्धेत किंवा पाठांतर स्पर्धेत कोणाचा नंबर येईल, कोणाचा येणार नाही हे तो पैज लावून बरोबर सांगत असे. अशा अनेक पैजा जिंकल्या होत्या त्याने!

आणि आता किरण शाळेत जायच्या आदल्या दिवशीचा प्रसंग...

...संदेश वर्गात नवीनच होता. एक दिवस राजशी पैज लावण्याचं त्याच्या मनात आलं. तो राजजवळ गेला. थोड्या इकडच्या तिकडच्या गप्पा मारून झाल्यावर संदेश मुख्य मुद्याकडे वळला.

''राज, तू नेहमी असं म्हणतोस ना की, लावलेली पैज तू कधीच हरत नाहीस?''

''हो, अर्थातच! यात तुला काही शंका आहे?''

''तसं नव्हे रे, मी आपलं सहज विचारलं. राज, काय रे, तुला ते नीलेंद्र आणि महेश दोघे जुळे भाऊ माहीत असतीलच.'' यावर राजने फक्त होकारार्थी मान डोलावली. संदेशचं बोलणं सुरूच होतं– ''ते दोघे जर समज एकदम तुझ्यापुढे येऊन उभे राहिले तर तुला त्यातला कोण पहिल्यांदा हाक मारेल?'' राजने चटदिशी उत्तर दिलं– ''महेश.''

''नक्की? बघ, पैज हरशील.''

''ए संद्या, पैज हरण्यातला मी नव्हे.''

मधल्या सुट्टीत महेश आणि नीलेंद्र एकदम राजजवळ आले. दोघांनीही राजला हाक मारली. पण महेशने आधी व नीलेंद्रने नंतर हाक मारली. राजने त्या दोघांकडे बघण्याऐवजी संदेशकडे बघितलं आणि म्हणाला, ''संद्या मी तुला सांगितलं होतं. मी पैज कधीच हरत नसतो. तू पैज लावताना एक विसरलास की, नीलेंद्रपेक्षा महेश मला जास्त जवळचा आहे. तू अजून वर्गात नवीन आहेस. समजेल तुला नंतर.'' महेश आणि नीलेंद्रने एक बातमी आणली होती की, दुसऱ्या दिवसापासून त्यांच्या वर्गात एक नवीन मुलगा येणार आहे आणि त्याचे बाबा आत्ताच सरांना भेटून गेले.

...दुसऱ्या दिवसापासून तो नवीन मुलगा– म्हणजे किरण शाळेत जायला लागला. वर्गात फक्त राजच्या शेजारची जागा रिकामी होती. बाकी सर्व बाक भरलेले. त्यामुळे सरांनी किरणला राजच्या शेजारी बसवलं. आता हळूहळू त्याचा किरणलाही अनुभव यायला लागला. दररोज वर्गात एकच विषय असायचं– आज राजने ही पैज जिंकली, आज राजबरोबर अमुक पैज हरला तर आज तमुकाने राजबरोबर पैज लावली...

हे सारे आठवून किरण म्हणाला, ''काय गं आई, जर राज, बरोबर तर्क करून पैज जिंकू शकतो तर अभ्यास करून तितकेच चांगले मार्क मिळवू शकतो ना?'' आईने यावर दोन मिनिटे विचार केला आणि तिने किरणला काहीतरी सांगितले.

दुसऱ्या दिवशी किरण शाळेत आला. त्याने आल्यावर बढाया मारायला सुरुवात केली. ''माझ्या इतके मार्क कोणीच मिळवू शकत नाही. मीच सर्वात हुशार आहे.'' किरणच्या बढाया ऐकून राज तिथे आला. त्याने नेहमीप्रमाणे किरणशी पैज लावली की, मी तुझ्याएवढे मार्क मिळवून दाखवीन.

''बघ राज. त्यासाठी अभ्यास करावा लागेल.''

''चल रे, पैज आपली यावर.'' राजने आव्हान स्वीकारलं.

दररोज शाळेत आल्यावर किरण राजला पैजेची आठवण करून देई. राज अभ्यासाला लागला. सगळी मुले आणि शिक्षक त्याच्याकडे बघून थक्कच होत. किरण खूप हुशार होता. गेल्यावर्षी त्याने ९१ टक्के मार्क मिळविले होते. त्यामुळे त्याच्याएवढे मार्क मिळवण्यासाठी राजला खूप मेहनत करावी लागणार होती. दरवर्षी ५० ते ६० टक्क्यांवर असणारा राज सहामाहीत ६७.५ वर आला. हळूहळू



वार्षिक परीक्षा जवळ येऊ लागली. तेव्हा राज जास्तीत जास्त वेळ अभ्यासात घालवू लागला. कारण मार्कांचा आणखी एक टप्पा त्याला सर करायचा होता. वार्षिक परीक्षा झाली... निकाल लागायची वेळ आली... त्या क्षणाला सर्वांचे पंचप्राण कानाशी एकवटले होते. शिक्षकांनी निकाल जाहीर केला– किरण आणि राजला दोघांनाही ९० टक्के मिळाले. पण राजला एक गुण जास्त मिळाला होता. दोघेही आनंदित झाले.

किरण पैज हरला होता. त्याने राजचे मनापासून अभिनंदन केले. त्याला घरी बोलावून नेले. किरणच्या आईने त्याला बक्षीस दिले आणि राज भारावून गेला... आणि तोच म्हणाला, ''किरण, तूच खरी पैज जिंकलास. आजपासून हे पैजा लावणं बंद. आपण आजपासून खरे मित्र. आता फक्त अभ्यास एके अभ्यास!''

***

**– मानसी जोशी** (इयत्ता १० वी)
'भावगंध', फाटक हायस्कूल,
रत्नागिरी.

**चित्रकर्ती :** वल्लरी मोरगावकर, (८ वी)

## जरा डोकं खाजवा!

पिंकीला बाईंनी या चौकटीतून कवींची नावे शोधावयास सांगितली आहेत. तुम्ही तिला मदत करा पाहू.

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| म | कु | त | नि | अ | ट | रें | र | सं |
| स | त | सु | व | श | के | दा | मी | म |
| के | ग | दि | मा | ड | गु | ळ | क | र |
| श | गो | विं | दा | ग्र | ज | क | ल | के |
| व | ज्ञ | क्ष | दा | ग | ज | र | क | ळ |
| कु | ड | बा | ल | क | वी | ती | थ | शे |
| मा | न | र | प | इ | रं | न | क | ता |
| र | वा | प | या | द | को | दी | ध | शां |
| टी | स | मी | य | त्त | वे | द | क | प |
| गौ | दी | मी | स | श | र | ल | स | र |
| आ | सं | प | अ | जे | ती | मा | मु | प्र |

## टाकाऊतून टिकाऊ

आईस्क्रिम कपमधील लाकडी चमचे वाया जाऊ देऊ नका. त्यावर



स्केचपेनने सुरेख नक्षी काढून, त्याचा उपयोग छानपैकी पुस्तकात वापरायचा पृष्ठसंकेत म्हणून होऊ शकतो. सोबत पाहा किती छान पृष्ठसंकेत तयार होतो.

❒ ❒ ❒

– **नेहा पाटील** (इ ७ वी)
**'भरारी'**, ज्ञानप्रबोधिनी केंद्र, रसायनी

## जरा गंमत

### ओळखा बरं?

१) चॉक आहे पण खडू नाही.
लेट आहे पण उशीर नाही.
कॅट आहे पण मांजर नाही.
बरी आहे पण ठीक नाही.

२) लाल आहे पण टोमॅटो नाही
कृष्ण आहे पण काळा नाही
आड आहे पण विहीर नाही
वाणी आहे पण दुकानदार नाही.

❒ ❒ ❒

**– चि. रणजीत आगाशे**

उत्तर – १) चॉकलेट कॅटबरी
२) लालकृष्ण आडवाणी

# विनोदसम्राट पुलं.

- कु. भक्ती नेरलेकर



आपल्या घरात जसं कुलदैवत असतं तसं आपल्या महाराष्ट्राचं एक 'पुलंदैवत' होतं. लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेलं, तरीही साधंसुधं, अघळपघळ, भोळसट, निरागस चेहऱ्याचं, कुरळ्या केसांचं आणि पुढच्या दोन दातांमुळे सशासारखं दिसणारं, अलोट प्रतिभेचं वरदान लाभलेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे शारदेने आपल्याला दिलेला जणू प्रसादच होय. देवी सरस्वती पृथ्वीवर आली आणि आपलं सप्तरंगी स्वप्न इथेच विसरून गेली. ते स्वप्न म्हणजे विनोद, नाट्य, चित्रपट, कथाकथन, गायन, साहित्य, समाजसेवा, या सात गुणांच्या संमीलनातून जन्माला आलेले 'पु.ल. देशपांडे'– तुमचे आमचे 'भाई' या सात पैलूंमुळेच पुलं घडत गेले आणि नवनवीन साहित्य घडवत गेले. पण विनोदाची कास मात्र त्यांनी कधीच सोडली नाही. मन उद्विग्न झालेलं असेल किंवा अगदी खुषीत असेल तेव्हाही, कधीही पुलंचं पुस्तक काढावं, हाताला येईल त्या पानापासून, कुठूनही वाचायला सुरुवात करावी आणि हसता हसता सारं जग विसरून जावं. पुलंचा विनोद हे साऱ्या रोगांवरचं रामबाण औषध आहे. जीवनात त्यांनी कित्येक सुखद क्षणांची, हलक्या–फुलक्या तरीही उच्च दर्जाच्या विनोदाची पखरण केली. विनोद हाच पुलंच्या साहित्याचा आत्मा आहे. मग ते 'बटाट्याच्या चाळी' तले बाबा कर्वे, त्रिलोकेकर असोत. 'व्यक्ती आणि वल्ली' मधले सखाराम गटणे, अंतु बर्वा असोत किंवा खुद्द पुलंचं 'गुळाचा गणपती' मधलं ध्यान असो. त्यांचा विनोद कधी जिव्हारी लागला नाही. त्यांनी कधी कुणावर हेतुपुरस्सर टोमणे मारले नाहीत. निर्विषपणा त्यांच्या विनोदाचा खास गुण! त्यांच्यातल्या गुणांमुळे असामान्यत्व लाभलेले पुलं मनाने मात्र सतत सामान्य मध्यमवर्गीयांत वावरायचे. त्यामुळेच मध्यमवर्गीयांची नाडी त्यांनी अचूकपणे ओळखल्याचं आपल्याला जाणवतं 'असा मी असा मी' मधे, आयुष्यात घडणाऱ्या विसंगती टिपत टिपत माणसांच्या हृदयाचा तळ शोधण्याचा पुलंचा प्रयत्नच त्यांच्या साहित्याला वरचे स्थान मिळवून देतो. बारीकसारीक तपशील भरत व्यक्तीचं साद्यंत दर्शन देणारी त्यांची चित्रदर्शी शैली रसरशीतपणा आणि जिवंतपणा दाखवत असतानाच सामाजिक स्पंदनांचाही शोध घेते. कालानुरूप बाह्यरंग बदलले तरी पुलं, सतत चिरंतनाचा शोध घेताना दिसतात. त्यांचं अबोध मन सतत काही ना काही टिपून घेत असे आणि ते सारं संचित त्यांच्या कलाविष्काराचं मूर्त स्वरूप घेऊन पुढे येत असे आणि त्यात त्याचं स्वत:चं असं काही सांगणंही असे. त्यामुळेच त्यांचं साहित्य स्थल – कालाच्या मर्यादा ओलांडून पुढे जातं आणि आजही 'पुलंनी म्हटल्याप्रमाणे' असं म्हणून त्यांच्या साहित्याची उजळणी सर्वत्र होताना दिसते. विशिष्ट श्रेणीच्या अभिरुचीसंपन्न विनोदातून पुलंनी वाचकाला स्वत:कडे तटस्थपणे पाहायला शिकवले. त्यासाठी त्यांनी आत्मकेंद्रित विनोदाचा वापर केला. कारण इतर लोकांकडे एक बोट दाखवत असताना, उरलेली चार बोटं आपल्याकडे असतात याचं त्यांना पूर्ण भान होतं. स्वत:चीच खिल्ली उडवत असताना त्यांच्यात दडून बसलेला १०–१२ वर्षांचा अवखळ, खट्याळ मुलगा वेळोवेळी डोकं वर काढत असे. पण त्याचबरोबर त्यांच्यात विचारवंत, तत्त्वज्ञानी, चारित्र्यसंपन्न माणूसही होता. त्यामुळेच विनोदाची लक्ष्मणरेषा त्यांनी कधीच ओलांडली नाही. त्यांनी जे जे टिपलं ते ते स्वत:त मुरवून घेत, आणखी खुलवून खुलवून इतरांना सांगितलं. याचं उदाहरण म्हणजे, राम गबाले आणि पु.ल.देशपांडे हनुमान टेकडीजवळ एका खोलीत राहात असताना एक धोबी त्यांचे कपडे धुवायला नेत असे. एके दिवशी त्याने राम गबालेंचा सदरा लांबवला आणि तो स्वत: वापरायला सुरुवात केली. या व्यक्तिगत अनुभवातून जन्म झाला तो 'व्यक्ती आणि वल्ली' तल्या नामू परिटाचा.

पण या सर्वांवर मात करते ती

**दारी फुलला प्राजक्त, गंध त्याचा दरवळतो, तसा कौतुकाचा स्वर, दाही दिशी पसरतो.**

पुलंच्या विनोदाला असलेली कारुण्याची झालर. पुलंनी रंगवलेल्या व्यक्तिचित्रांच्या, पारदर्शी जीवनातील हृदयाला हेलावणाऱ्या प्रसंगांमुळे डोळ्यांच्या कडा पाणावतात. विनोदांच्या उचंबळणाऱ्या सागराला कारुण्याचा किनारा असावा त्याप्रमाणेच, खळखळून हसवणाऱ्या विनोदाच्या अखेरीस पुलं चटकन डोळ्यांत पाणी आणतात. म्हणूनच कदाचित त्यांना हृदयाला हात घालणारे 'चार्ली चॅप्लिनचे' चित्रपट आवडत असावेत.

आयुष्यभर आपल्याला हसवणारे पुलं वारले आणि सरस्वतीच्या हातातील वीणेची एक तारच तुटली. पुलंचे निधन म्हणजे एखाद्या निखळ आनंद देणाऱ्या विनोदाचा करुण शेवटच जणू! प्र.के. अत्रेंच्या भाषेत सांगायचे झाल्यास 'अशी वल्ली पुढील दहा हजार वर्षांत होणे नाही.' कदाचित स्वर्गात गेल्यावर पुलं देवाला म्हणालेही असतील, 'तुझे आले तुजपाशी.' पण विनोद ज्याच्या अंगाखांद्यावर लीलया बागडला, त्या मराठी संस्कृतीच्या अतुलनीय मानदंडाची आठवण काढत, आपलं मराठमोळं मन आक्रंदत राहील.

***''आज महाराष्ट्र रडणार नाही,***
***यापुढेही नाही.***
***तुमची आठवण काढून, एकेक***
***शब्द आठवून***
***हसेल.... हसत राहील...***
***हसून हसून डोळ्यांत पाणी येईल***
***एवढंच....***

❒ ❒ ❒

– **कु. भक्ती नेरलेकर** (इयत्ता १० वी)
बी ३०६, बिंगो प्लाझा,
१, श्रीखंडेवाडी, डोंबिवली (पू.)
**चित्रकर्ती :** वल्लरी मोरगावकर, (१० वी)

## स्मरणशक्ती व बुद्धीवाढीसाठी उपयुक्त – आवळा

**खे**डेगावात नव्हे तर शहरातसुद्धा आवळा हे फळ अपरिचित नाही. सर्वांना परिचित असलेले हे फळ ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात तयार होते. आयुर्वेदात आवळ्याला फार महत्त्वाचे स्थान आहे. च्यवनप्राश, त्रिफळाचूर्ण, केसांची पावडर यामध्ये आवळा आवर्जून असतोच.

आवळा हा वर्षभर उपलब्ध नसल्याने तो वाळवून ठेवावा लागतो. तो वाळवून ठेवल्यास त्यास आवळकाठी असे म्हणतात.

आवळ्याच्या अंगी अनेक औषधी गुणधर्म असल्याने अनेक व्याधी सहज बऱ्या होतात.

आवळ्याचा रस अनेक रोगांवर उपयुक्त असतो. जर आम्लपित्त झाले असेल तर आवळ्याच्या रसात जिरे आणि खडीसाखर घालून सकाळ-संध्याकाळ दोन-दोन चमचे ते मिश्रण घेतल्यास



आठ दिवसांत गुण येतो. जर आवळ्याचा रस मिळाला नाही तर वाळलेल्या आवळ्याची पूड करून रात्री पाण्यात भिजत ठेवावी व सकाळ-संध्याकाळ घ्यावी. पंधरा दिवसात गुण येतो. लघवी फारच कमी होत असल्यास किंवा जळजळ होत असल्यास एक पेला उसाच्या रसातून दोन चमचे आवळ्याचा रस घ्यावा. त्वरित गुण येतो. त्यामुळे लघवीची जळजळ थांबते. थेंबाथेंबाने लघवी होत असेल तर ती साफ होते. लघवीच्या बऱ्याच तक्रारींवर आवळ्याचा रस उपयुक्त ठरतो. रोज एक आवळा खाल्ल्यास मलावरोधाची तक्रार दूर होते. पोट जड होणे, भूक न लागणे, गॅसेस असे विकारही नाहीसे होतात. आवळ्याची पूड चर्मरोगावर अत्यंत उपयुक्त ठरते. आवळ्याची पूड भिजवून थोडी मऊ करून खरजेवर लावल्यास गुण येतो.

तापाने किंवा कशानेही डोके किंवा कपाळ तापल्यास, आवळकाठी दुधात वाटून तिचा कपाळावर लेप द्यावा. उपयोग होते. केस अकाली गळत असल्यास आवळ्याचा रस, जेष्ठमध, चंदन, निळेकमळ आणि पिंपळ यांचा कल्क तिळाच्या तेलात घालून तयार केलेले तेल, डोक्याला लावल्यास आठ दिवसात केस गळण्याचे थांबतात. आवळ्याचा रस आणि स्वमूत्र जर केसांना रोज सकाळी चोळून लावले तर केस काळे होण्यास मदत होते. आवळा खाल्ल्याने दृष्टी सुधारून त्वचा सतेज बनते. स्मरणशक्ती आणि बुद्धिवाढीसाठी आवळा हे एक उत्तम औषध आहे.

❒ ❒ ❒

– **कु. भावना पटवर्धन** (इयत्ता ९ वी)
**'कस्तुरी'** न्यू इंग्लिश स्कूल, सातारा.

**निरोप देती होत बिचारे डोळां आणित पाणी, आणि कुणाचे शब्द हरवले, अबोल झाली वाणी।।**

## वाचलेच पाहिजे असे काही

# *Children Who Made It Big*

**कु.वल्लरी मोरगावकर**

सुट्टी आली की काय वाचू नि काय नको असं आपल्या होऊन जातं. कथांच्या पुस्तकांचा तर अगदी फडशाच पाडला जातो. पण मी आज अशा एका पुस्तकाबद्दल तुम्हाला सांगणार आहे की ज्यातून तुमचं मनोरंजन तर होईलच पण अनेक मोठ्या व्यक्तींच्या बालपणाविषयी, त्यांना मोठे बनायला मदत करणाऱ्या प्रसंगांविषयी त्यात वाचायला मिळेल. ह्या पुस्तकात नानी पालखीवाला, मेधा पाटकर, सतीश गुजराल, ललिता सेठ, राहुल बजाज, विश्वनाथन आनंद, प्रा.यशपाल, अमजद अली खान, मृणालिनी साराभाई, रस्किन बाँड, एम.एस. स्वामिनाथन, सई परांजपे या विविध क्षेत्रांतील श्रेष्ठ व्यक्तींच्या बालपणीचे प्रसंग दिले आहेत. ह्या व्यक्तींनासुद्धा लहानपणी प्रत्येक मुलाप्रमाणेच म्हणजे अगदी तुमच्या–आमच्यासारख्याच भावभावना होत्या. त्यांना स्वत:ची स्वप्ने आणि ध्येये होती, आनंद आणि दु:ख, शंका व प्रश्न होते. अगदी प्रत्येक बालवाचकासारखे. पण ह्या प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात लहानपणी असे काही प्रसंग घडले, ज्यांनी त्यांच्या मनावर ठसा उमटवला आणि त्यांना कष्ट करायला, दुसऱ्याविषयी आदर बाळगायला शिकवले. त्यांना स्वत:च्या देशासाठी काहीतरी करायला उद्युक्त केले.

A Handful of Almonds हा नानी पालखीवालांच्या बालपणीचा प्रसंग आहे. त्यांनी, त्यांच्या आईने त्यांना बक्षीस दिलेले सगळे बदाम, जहांगीर नावाच्या त्यांच्या अनाथ मित्राला देऊन टाकले. त्यांना स्वत:ला बदाम खूप आवडत असल्यामुळे ते सुरुवातीला बदाम द्यायला तयार नव्हते, पण त्यांच्या वडिलांनी त्यांना शांत,




प्रेमळ आवाजात सांगितले, ‘‘देवाने तुला आयुष्यात खूप काही दिले आहे. तुला आई–वडील आहेत. आपण शिकलेलो आहोत. आपण एका चांगल्या घरात राहातो. देवाने आपल्याला हे सारे का दिले तुला माहीत आहे? कारण हे आपण त्यांना द्यावे, जे गरीब, दु:खित आहेत.’’ नानीला वडिलांचे म्हणणे पटले व त्यांनी ते सगळे बदाम जहांगीरला देऊन टाकले, त्यामुळे त्याला खूप आनंद झाला. त्यामुळे जहांगीरच्या चेहेऱ्यावरचा आनंद बघून नानीला इतरांना द्यायचे महत्त्व कळले. त्याला कळले की जग हे दु:खी लोकांनी भरलेले आहे. जे स्वत:साठी लढू शकत नाहीत, त्यांच्यासाठी कदाचित मी लढू शकेन, असे लहानपणी त्यांना वाटले आणि ते मोठेपणी प्रसिद्ध वकील आणि मानवी हक्कांचे पुरस्कर्ते बनले. त्यांना लहानपणी तोतरेपणाचा त्रास होता. पण त्यावर मात करून मोठेपणी त्यांनी मोठमोठी भाषणे कशी केली तीही धडपड वाचण्यासारखी आहे.

The Bus Stop हा मेधा पाटकरांच्या आयुष्यातील प्रसंग आहे. बस स्टॉपवरील वृद्ध, अपंग व दुबळ्या भिकाऱ्याविषयी सर्वांनाच तुच्छता वाटत होती. त्यांच्या अंगाला येणारा घाण वास पाहून सर्वांनी नाकावर रुमाल दाबून धरला. पण मेधाने मात्र विचार केला, ‘‘या माणसाला नक्कीच घरदार, नातेवाईक नसावेत. नाहीतर तो रस्त्यावर असा भटकला नसता. त्याला नातलग असते, घरदार असते, तर तो आज किती सुखी असता!’’ तिला त्याच्याबद्दल दया, करुणा वाटू लागली. इतक्यात त्या माणसांच्या अंगावर कोणीतरी एक नाणे फेकले. पुढे काय घडले ते प्रत्यक्षातच वाचायला हवे.

सतीश गुजराल यांच्या बालपणीच्या Colours of the Silence या कथेत, बालपणी एका अपघातामुळे आलेल्या बहिरेपणाच्या व्यंगावर मात करून, ते मोठेपणी कसे श्रेष्ठ चित्रकार व शिल्पकार बनले याची कहाणी आहे. चित्रकला महाविद्यालयात शिकत असताना इतर मुले त्यांची टर उडवत असत. तेव्हा त्यांनी विचार केला, ‘‘मी जे काम करीन त्यावरून लोक मला ओळखतील. जेव्हा कोणी एखाद्या चित्राकडे बघते, तेव्हा तो चित्रकार बहिरा, दुबळा किंवा अपंग होता का असे विचारत नाहीत.’’ सतीशने ठरवले की मी चांगले, कदाचित त्यांच्यापेक्षाही चांगले काम करीन आणि मग कोणी माझी खिल्ली उडवणार नाही. मोठेपणी त्यांचे हे स्वप्न खरोखरच प्रत्यक्षात उतरले.

Oh! To Be The Best ! हा



**होऊ मोठे, तुमच्याहूनही, राहू उन्नत सदैव आम्ही! आरोहण हे मिळून करणे, हे अमुचे कर्तव्य असे।।**

ललिता सेठ यांच्या बालपणीचा प्रसंग आहे. एका परीक्षेच्या आधी आपला अभ्यास झालाय असे वाटल्यामुळे त्या त्यांच्या भावाबरोबर खेळत राहिल्या. पण प्रत्यक्षात परीक्षेच्या दिवशी मात्र, अभ्यास न केल्यामुळे त्यांना काहीच आठवले नाही आणि परीक्षेत त्या चक्क नापास झाल्या. तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांना सांगितले, ''चांगला अभ्यास करणे हे प्रत्येक विद्यार्थ्याचे कर्तव्य आहे. प्रत्येकाने प्रयत्न करावेत आणि सर्वोत्तम काम करावे. आपण करीत असलेले कोणतेही काम वाईट नसते. लक्षात ठेव, चांभार होण्यात काहीच वाईट नाही, पण वाईट पादत्राणे तयार करणे हे वाईट वाहे.''

या प्रसंगानंतर त्यांनी मन लावून खूप अभ्यास केला आणि अभ्यासातील उत्तमता सतत वाढवायचा प्रयत्न केला. त्यामुळेच मोठेपणी त्या Bar final परीक्षेमध्ये United Kingdom मधील सर्व उमेदवारांमध्ये पहिल्या आल्या आणि प्रसिद्ध वकील बनल्या.

बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद त्यांच्या लहानपणी सर्व स्थानिक स्पर्धांमध्ये सहभागी होत असे. अशा एका स्पर्धेत त्याला एका प्रसिद्ध विदेशी खेळाडूबरोबर खेळायची संधी मिळाली. आनंद त्याच्याबरोबर खेळताना इतर सर्व गोष्टी विसरला. त्याने फक्त समोरच्या बुद्धिबळपटावर लक्ष केंद्रित केले. त्याने विचार केला, ह्याने आत्ता जर ही खेळी केली तर मी नक्की जिंकू शकेन. पण नंतर त्याने विचार केला की इतका मोठा खेळाडू अशी चूक करणार नाही. पण त्या खेळाडूने ती चूक केली आणि आनंदने तो सामना जिंकला. त्याच्या आईने त्याला सांगितले की, ''तू वरच्या पातळीवर आणि विचारपूर्वक खेळलास त्यामुळे तू जिंकलास.'' या सामन्यातून आनंदला पुढच्या सामन्यांसाठी प्रेरणा मिळाली.

मृणालिनी साराभाई यांच्या लहानपणची आठवण मला खूप आवडली. नृत्यातील गुरु शोधण्यासाठी त्या घरच्या गाडीच्या ड्रायव्हरबरोबर पूर्ण मद्रास शहरात फिरल्या. त्या कोणत्याही माणसापाशी गाडी थांबवून त्याला विचारत. ''तुम्हाला अशी व्यक्ती माहीत आहे का, जी मला भरतनाट्यम् शिकवू शकेल?'' त्यावेळी नृत्य आजच्या इतके प्रसिद्ध नव्हते. त्यामुळे मृणालिनीला खूप शोध घ्यावा लागला. पण ती थांबली नाही. शेवटी तिला तिचे गुरू कसे भेटले, ते मात्र मुळातूनच वाचायला हवे.

सई परांजपे लहान असताना त्यांना बाहुल्यांची लग्ने खूप आवडत असत. त्या आईकडे स्वतःच्या बाहुलीचे लग्न लावायचा हट्ट करायच्या. तेव्हा त्यांच्या आईने बाहुला- बाहुलीचे लग्न खरे रेशमी कपडे शिवून, खरेखुरे फराळाचे, गोडधोडाचे पदार्थ तयार करून, खरा बँड बोलावून, घराचा हॉल सजवून कसे दणक्यात पार पाडले, ते वाचणे खूप मनोरंजक आहे.

एका संगीत मैफिलीत वडिलांना साथ करायला सरोदवादक अमजद खान गेलेले असताना त्यांच्या वडिलांनी 'ह्या मैफिलीत फक्त अमजदच वाजवेल'' असे अचानक जाहीर केले. त्यांनी गोंधळून न जाता ती मैफिल आत्मविश्वासाने कशी जिंकली, ते वर्णन खूप छान आहे.

राहुल बजाज यांना भारतातील सुंदर परंपरांचा अभिमान वाटायचा. या परंपरांचे जतन करायला शिकवणारा प्रसंग खूपच वाचनीय आहे. लोकांमध्ये आत्मविश्वासाची भावना निर्माण केल्यास ते एकत्र येऊन खूप काही करू शकतात हे प्रसिद्ध कृषीशास्त्रज्ञ एम.एस. स्वामीनाथन यांना शिकवणारा प्रसंगही आवर्जून वाचावा असाच आहे. हे सर्व प्रसंग वाचताना एक वेगळीच सुंदर अनुभूती येते.

प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ यशपाल लहानपणी क्वेटा येथे राहात होते. तिथे एकदा खूप मोठा भूकंप झाला. त्या भूकंपानंतर त्यांना भौतिकशास्त्राची कशी आवड निर्माण झाली, ते वर्णन फारच सुंदर आहे. यशपाल यांनी मोठेपणी Satelite Classrooms ची निर्मिती केली. प्रसिद्ध लेखक रस्किन बाँड यांचे वाचन-लेखन हेच जीवन होते. शाळेत असतानाही ते जे काही लिहीत ते खूप वेगळे, क्रांतिकारी विचार मांडणारे असे स्वतंत्र लेखन असे. त्याबद्दल अध्यापक त्यांना रागवत. पण तरीही त्यांनी आपले विद्रोही लेखन थांबवले नाही; हे वर्णन अगदी आवर्जून वाचण्यासारखे आहे. त्यांच्या विद्रोही लेखनाची मुळे आपल्याला त्यांच्या बालपणापासूनच्या लेखनात दिसतात.

अशी ही या पुस्तकातील लेखांची एक झलक आहे. हे पुस्तक वाचणाऱ्याला खूप काही शिकवून जाते. आपल्यामध्ये असलेली जिद्द, आत्मविश्वास हे गुण जागृत होतात. आपल्याला त्यांच्यासारखेच काही, वेगळे, नवे करायची प्रेरणा मिळते.

ह्या पुस्तकाची भाषा इंग्लिश असली तरी ती सोपी आणि मुलांना समजेल अशी आहे. असे हे पुस्तक प्रत्येकाने नक्कीच वाचायला हवे.

***

लेखक - Thangamani

पृष्ठसंख्या- १६३ किंमत २५/-

प्रकाशन- National Book Trust, India


**- कु. वल्लरी मोरगावकर,** (इयत्ता ९ वी)
श्री वरद हौ. सोसायटी,
विठ्ठलवाडी देवळासमोर, पुणे-५१



**काया- वाचा- मने शिकावे! जिवंत अनुभव घ्यावे- द्यावे!! सत्य नि सुंदर साकारावे, हा अमुचा आनंद असे !**

# 'लोणार' वैज्ञानिक नजरेतून

- कु. मनाली कुलकर्णी



सुमारे चाळीस ते पन्नास हजार वर्षांपूवीची गोष्ट आहे. अंतराळात भ्रमण करणाऱ्या हजारो-लाखो दगडांतील एक दगड पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे पृथ्वीकडे झेपावला. पृथ्वीच्या वातावरणाशी झालेल्या घर्षणाने त्याचा आकार कमी कमी होत गेला. प्रचंड ऊर्जा निर्माण झाली व जणू काही सूर्यच पृथ्वीकडे झेपावतो आहे असे वाटू लागले! असा हा प्रचंड दगड (अशनी) भारतभूच्या दिशेने आला. दगडी महाराष्ट्राच्या छातीवर आदळला. या आघाताने महाराष्ट्रातील त्या जागेवर एक खळगा तयार झाला. त्यानंतर तो प्रचंड दगड कदाचित भूपृष्ठाखाली रुतून बसला असावा किंवा वातावरणाशी झालेल्या घर्षणाने नाहीसा झालेला असावा. ही सर्व घटना घडली महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील 'लोणार' या तालुक्याच्या गावी.

अंतराळात फिरणारे उल्काभ असेच पृथ्वीकडे आकर्षिले जातात व बरेचदा पृथ्वीच्या वातावरणाशी झालेल्या घर्षणाने ते नाहीसे होतात. रात्री आकाशाकडे पाहिले असता मधूनच एखादी प्रकाशशलाका दिसते. त्याला आपण उल्का पडली असे म्हणतो. वास्तविक पृथ्वीच्या वातावरणाचे कवच, या उल्कांना नष्ट करून आपले संरक्षण करते.

मात्र कधीकधी एखादा प्रचंड उल्काभ गुरुत्वाकर्षण कक्षेत शिरला तरी पूर्णपणे नष्ट होत नाही व अशनीरूपाने पृथ्वीवर आदळतो.

भूपृष्ठावर आदळणाऱ्या अशनींमुळे जगभर अनेक ठिकाणी विवरे तयार झाली आहेत. यापैकी एक आहे लोणार विवर. मात्र हे विवर एकमेवाद्वितीय ठरले आहे. ते या विवराच्या चांद्रपृष्ठावरील विवरांशी झालेल्या सारखेपणामुळे. चांद्रपृष्ठाप्रमाणे बेसाल्ट खडकावरील आघातामुळे तयार झालेले हे जगातील सर्वात मोठे आघात-विवर आहे. जगभरच्या आघात विवरांमध्ये याचा तिसरा क्रमांक लागतो. पहिल्या क्रमांकावर आफ्रिकेतील घाना देशातील बोसुमत्वी विवर असून त्याचा व्यास सुमारे १०,००० मी. आहे. दुसऱ्या क्रमांकावर कॅनडातील न्यू कके वेकचे विवर असून त्याचा व्यास २५०० मी. आहे. नंतर १८३० मी. व्यासाचे व सुमारे १५० मी. खोलीचे लोणार सरोवर आहे.

अर्थातच अशाप्रकारची विवरे ज्वालामुखीजन्यही असू शकतात. अशीच ज्वालामुखीमुळे तयार झालेली अनेक विवरे या विवर परिसरात आढळतात. दख्खन पठारावरील ज्वालामुखीचा उद्रेक व त्यामुळे झालेले हे थर ही लाखो वर्षापूर्वीची प्रक्रिया आहे, त्यामानाने हे विवर अगदीच तरुण म्हणजे ४०,००० ते ५०,००० वर्षांचे आहे, असे तेथील भूगर्भाच्या अभ्यासावरून आढळते. या व इतर संशोधनातून लोणार विवर उल्काघाती असल्याच्या सिद्धांताला पुष्टी मिळाली आहे. लोणारच्या वैशिष्ट्यपूर्ण विवरांचे अस्तित्त्व फार पूर्वीच संशोधकांच्या, अभ्यासकांच्या लक्षात आले आहे. १८२३ साली जे.इ. अलेक्झांडर यांनी या विवराकडे लक्ष दिले. १८९६ साली जी.के. गिलबर्ट याने अमेरिकेतील ॲरिझोना विवराशी या विवराचे साम्य असल्याचे निदर्शनास आणले. या अभ्यासाचा रोख लोणार विवर ज्वालामुखीजन्य असल्याचाच होता. या विवराचा परिपूर्ण अभ्यास भारतीय भूशास्त्र सर्वेक्षण संस्था व स्मिथ सॉनियन इन्स्टिट्यूट यांनी गेल्या दोन दशकांत केला. त्यातून हे



**आम्ही निर्धाराचे मेरू, छातीवरती प्रहार झेलू, सदैव उन्नत अचल शिरावर, काळाच्या आभाळा पेलू।।**

आघात विवर असल्याचे सिद्ध झाले.

यासाठी त्यांनी विवरमुखाशी सुमारे १०० मी. खोलवर खोदकाम केले. खडकांचे नमुने घेतले. त्यांचे परीक्षण केले. यात त्यांना भूगर्भात पाण्याखाली सेडीमेन्ट्स, कोर्स ब्रोसिया, ग्लास बेड रॉक असल्याचे आढळले.

मॅकसेलनाइट सर्वसाधारण स्वरूपात आढळत नाही. बेसाल्ट खडकातील फेल्स्पार खनिजातील पॅजिओकलेज या द्रव्यावर जेव्हा प्रचंड आघात होतो तेव्हा त्या दाबामुळे, उष्णतेमुळे या खनिजाचे रूपांतर मॅकसेलनाइटमध्ये होते. अशा प्रकारचा आघात ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे शक्य नसतो. म्हणूनच त्यात मॅकसेलनाइट तयार होऊ शकत नाही. असे मॅकसेलनाइट बिहारमधील शेर्गोटी येथे पडलेल्या अशनीत व रशियातील लिथुआनिया या नुकत्याच स्वतंत्र झालेल्या राष्ट्रातील पॅडवॅनिकल येथील अशनीतही आढळले होते. शेर्गोटीचा अशनी सध्या कोलकत्याच्या भूशास्त्र सर्वेक्षण संग्रहालयात ठेवण्यात आला आहे.

या सर्व संशोधनाचा आढावा घेतला असता लोणार सरोवर नक्की कसे निर्माण झाले याचा अंदाज बांधता येतो. त्यातील काही मुद्दे पुढीलप्रमाणे १) लोणार विवर तयार करणारा अशनी भूगर्भात अजूनही रुतून बसला असावा. मात्र असे असेल तर तो बराच खोलवर असेल व यासाठी भूगर्भात बरेच खोदकाम करावे लागेल. पण त्याचे अस्तित्व शोधून काढले तर फार काही साध्य होणार नाही.

२) हा अशनी वातावरणात शिरताच तो नष्ट व्हायच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. तो भूपृष्ठाच्या संपर्कात आला. प्रचंड दाब, उष्णता याने भूपृष्ठ वितळले व आघात कंपनांनीच हे सरोवर निर्माण झाले. अशनीतील द्रव्याचे मात्र बाष्पीभवन झाल्याने अशनी पूर्णपणे नष्ट झाला.

३) भूगर्भात शिरलेल्या अशनीचे तुकडे परावर्ती कंपनामुळे बाजूला भिरकावले गेले व त्यांनी परिसरात काही विवरे तयार केली. त्यापैकी अंबरतळे व गणेशतळे ही दोन मोठी विवरे आहेत. अनेक छोटी विवरे या परिसरात असावीत. मात्र या परिसरात अशी विवरे किंवा अशनींचे तुकडे आढळल्याची नोंद नाही. एवढे मोठे विवर निर्माण करणारा हा अशनी सुमारे ६० मी. लांब व २ कोटी टन इतक्या वजनाचा असावा व त्याने केलेल्या आघातातून निर्माण झालेली ऊर्जा ही जवळ जवळ ६ मेगाटन म्हणजे बॉम्बच्या स्फोटामुळे होणाऱ्या ऊर्जेइतकी असावी असा अंदाज आहे.

***

**– कु. मनाली कुलकर्णी 'बालमित्र'**
चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली.



**ज्या मातीवर आज उभा मी, ताठ ठेऊनी मान, आसेतु हिमाचल ही माती, जिचा मला अभिमान**
With Best Compliments from : **Finishing Furnace System (India) Pvt. Ltd.**



## निसर्गाच्या कुशीत

निजलो होतो मी हिरव्यागार शालीत,
थंडगार त्या हिरव्या झाडांच्या सावलीत.

नैसर्गिक वाऱ्याचा छानसा ए.सी. होता,
अतिसुगंधी फुलांचा रुमफ्रेशनर होता.

भूक लागल्यास खायला तेथे मधुर फळे होती,
माझ्या सोबत खेळायला तेथे पक्षीमंडळी होती.

खळखळत होतो तेथे निर्मळ झरा छान,
जणू ऐकू येत होती बागेश्रीची तान.

नको बाबा शहरात, तेथे हवा आहे दूषित,
खूप सुखी राहीन मी निसर्गाच्या कुशीत.

**– चि. अमुक म्हसकर**
**'अनंत रंग'**, अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत.

### ☺ हसा–हसा ☺

★ **गुरुजी–** राजू सांग पाहू, घरातली वीज आणि आकाशातली वीज यात काय फरक आहे?
**राजू–** आकाशातील वीजेचे बिल आपल्याला भरावे लागत नाही.

### 'जरा डोकं खाजवा'चे उत्तरे

**उत्तर :** कुसुमाग्रज, रेंदाळकर, केशवसुत, ग.दि. माडगुळकर, गोविंदाग्रज, बालकवी, दया पवार, केशवकुमार, शांता शेळके, दत्त, विं.दा. करंदीकर




# कलियुगातील कुंभकर्ण

- कु. स्नेहा देशपांडे

**मा**झ्या भावाच्या वाढदिवसासाठी माझे आई-बाबा व धाकटी बहीण-श्रेया त्याच्याकडे गेले. खरं सांगायचं तर मला सुद्धा अगदी मनापासून त्याच्याकडे वाढदिवसासाठी जायचे होते. कारण तिकडे माझे सर्व नातलग म्हणजे आजी-आजोबा, मामा-मामी, मावशी येणार होते आणि खाण्यासाठी मस्तपैकी पाव-भाजीचा बेत होता. परंतु असे काही असले की, नेमका शाळेचा गृहपाठ जास्त असलाच पाहिजे. माझ्याही बाबतीत त्या दिवशी तसेच झाले. शाळेत आम्हाला खूप गृहपाठ दिला होता व तो केला नाही तर दोन वेळा करावा लागला असता आणि हे सर्व टाळण्यासाठीच मी वाढदिवसाला न जाण्याचा निर्णय का-कू करत घेतला.

आई-बाबा ऑफिसमधून येऊन



रात्री ७-८ च्या सुमारास भावाकडे गेले होते. त्यामुळे ते रात्री उशीरा घरी येणार होते. जाताना आईने मला पन्नास वेळा बजावून सांगितले होते की, ''मी येईपर्यंत अजिबात झोपायचं नाही. खूप झोप आलीच तर शेजारच्या काकूंकडे जाऊन झोप.'' आईचे हे प्रवचन ऐकून मी तिला झोपणार नाही, मला खूप अभ्यास आहे, असे सांगितले. मनाशी निश्चयही पक्का केला-आई-बाबा व श्रेया आल्याशिवाय मुळीच झोपायचं नाही.

पण काय करणार? म्हणतात ना 'पडले वळण इंद्रियासी' यानुसार मी माझ्या नेहमीच्या सवयीप्रमाणे दिवाणावर अभ्यासाला बसले. थोडा वेळ छान अभ्यास झाला. पण हळूहळू मी दिवाणावर पहुडू लागले व म्हणता म्हणता मला छान गाढ झोप लागली.

रात्री अकरा-साडेअकराच्या सुमारास आई-बाबा आले. त्यांनी ४-५ वेळा बेल वाजविली. मला हाका मारल्या. परंतु मी एवढी गाढ निद्रेत होते की, मलाकाहीच ऐकू आले नाही. त्याच दिवशी आमच्या शेजारच्यांकडे कसलं तरी गेट-टू-गेदर होतं. त्यामुळे त्यांच्याकडे २०-२५ मित्रमंडळी जमली होती. आई-बाबांनी मला मारलेल्या हाकांच्या आवाजामुळे काय झाले ते बघायला हळूहळू सर्वजण बाहेर आले. मजल्यावरची इतर बिऱ्हाडेही पॅसेजमध्ये जमली. हा-हा म्हणता वरच्या-खालच्या सर्व मजल्यावरूनसुद्धा माणसे जमू लागली आणि त्यामुळे आमचा मजला माणसांनी फुलून गेला. प्रत्येकजण गोंधळात भर घालत होता. जो-तो एकमेकांना विचारू लागला. ''झाले तरी काय?''व एकाकडून दुसऱ्याला सांगता सांगता मी झोपल्याची बातमी सुपीक डोक्याने काहीतरी प्रयोग सुचवू लागला. कोणी म्हणाले- गॅलरीतून चढा तर कोणी म्हणाले पहिले सेफ्टी डोअरच उघडायचा प्रयत्न करा, तर कोणाला वाटले बाहेरून मला हाक मारल्यासच मी उठेन. माझ्या आई-बाबांनी मला शेजारून फोन सुद्धा केला. इकडे बेलचा गजर सुरू होताच. पण ती तरी बिचारी किती वेळ वाजणार? शेवटी ती सुद्धा बंद पडली. परंतु या साऱ्या गोष्टींचा मला अजिबात थांगपत्तासुद्धा नव्हता. कुंभ रास असल्यामुळे कुंभकर्णाचा थोडा अंश उतरला असेल, असे काहींचे मत पडले.

पण माझे आई-बाबा तर चांगलेच काळजीत पडले होते. शिवाय हा सगळा गोंधळ. प्रत्येकाची भिन्न मते हे ऐकून तर त्यांना अगदीच लाजिरवाणे झाले होते. जर ते तिघे वाढदिवसाला



निळ्या गूढ आकाशाचे कधी पडे प्रतिबिंब, स्वप्नात मी हिंडता हिंडता झालो तिथेच दंग
प्रायोजक : विश्वकुमार विश्वनाथ आर्किटेक्टस् प्रा.लि. पुणे.

गेले नसते तर हा प्रसंगच उद्‌भवला नसता, असे आईला वाटले. एरवी माझ्याशी सारखी भांडणारी माझी बहीण तर चक्क रडायलाच लागली. बाबासुद्धा खूप वैतागले होते. प्रत्येकाला तोंड देऊन ते थकून गेले होते.

शेवटी रात्री एक-दीड वाजता सगळेजण कंटाळले व त्यांनी हळूहळू आपापल्या घरी पलायन केले. आई-बाबा व श्रेया, शेजारच्या काकूंकडे झोपायला गेले. मग सकाळी सहाच्या सुमारास परत एकदा आईने मला हाक मारली. पण ही हाक मात्र मला ऐकू आली व मी ताडकन उठून दार उघडले. मी दार उघडल्याबरोबर काही शेजारील मंडळी अगदी पहाटेसुद्धा माझ्या स्वागतासाठी आली व ''काय, कशी काय झाली कुंभकर्णाची झोप....'' अशा प्रश्नांची माझ्यावर सरबत्ती सुरू झाली.

***

**– कु. स्नेहा देशपांडे,** (९ वी)
**'आग्नेय'**, चंद्रकांत पाटकर, विद्यालय डोंबिवली.
**चित्रकार : शौनक निवर्गी,** (५ वी)

---

## पक्ष्यासारखा उडणारा एकमेव प्राणी
# वटवाघूळ

**गा**वापर्यंत भुर्रकन उडून जावे आणि तसेच परत यावे, हे अजूनही आपले स्वप्नच आहे. खऱ्या अर्थाने उडू शकणारा प्राणी आहे-वटवाघूळ. वटवाघळाचे पूर्वज झाडांच्या फांद्यांमधून थोडेसे उडत असत. पण सततच्या प्रयासामुळे, कालांतराने त्यांचे पंख रुंदावत गेले आणि मग कित्येक मैल उडणे त्यांना शक्य झाले. वटवाघळाच्या हातांचे रूपांतर पंखात झाले तरी चालताना किंवा झाडावर चढताना, त्यांचा हातांप्रमाणेच उपयोग होऊ शकतो.

वटवाघळाच्या हाताची बोटे फार लांब झालेली असतात. या बोटांमध्ये आणि शरीराच्या दोन्ही बाजूंनी मागील पायापर्यंत पातळ कातडे असते. हेच पंख होत. बोटे मिटून कोपरापासून हात आखडून घेतला की, पंखांची घडी होते. बोटे आणि हात बळकट असतात, पण त्या मानाने मागचे पाय अगदीच नाजूक असतात. झाडांवर किंवा तारांवर उलटे लटकून विश्रांती घेणारा हा एकमेव प्राणी आहे. तार किंवा झाडाच्या आधारावर वटवाघळाचा पाय धातूच्या कडीप्रमाणे मजबूत बसतो. टांगलेल्या अवस्थेत मृत्यू आल्यास, मेलेले वटवाघूळ लोंबकळत राहाते, इतकी त्याची पकड घट्ट असते. विजेच्या एकाच तारेवर वटवाघूळ लटकले तर अपाय होत नाही, पण बऱ्याचदा दोन तारांतील अंतरापेक्षा वटवाघुळाची लांबी जास्त असते, त्यामुळे दुसऱ्या तारेला स्पर्श झाला की, वटवाघूळ मरते.

फळ खाणारे आणि कीटक खाणारे असे वटवाघळांचे दोन प्रकार आहेत. शास्त्रीय भाषेत त्यांना अनुक्रमे 'मेगॅचिरॉप्टेरा' आणि 'मायकोचिरॉप्टेरा' असे म्हणतात. नावाप्रमाणेच फळ खाणाऱ्या वटवाघळांचा आकार मोठा असतो. कीटक खाणारी वटवाघळे लहानखुरी असतात. 'फ्लाईंग फॉक्स' नावाने ओळखली जाणारी भारतीय वटवाघळे २३ सें.मी. लांब असतात, तर त्यांच्या पंखांची व्याप्ती एक मीटर असू शकते.

वटवाघळे दिवसा विश्रांती घेतात आणि रात्री बाहेर पडतात. अंधारात फळांची चोरी करणे सोपे जाते आणि फळे खाणाऱ्या इतर पक्ष्यांबरोबर स्पर्धाही नसते. म्हणून ही निशाचर वृत्ती त्यांनी जोपासली आहे. दिवसा गावातल्या एखाद्या उंच वृक्षावर वटवाघळे शेकडोंच्या संख्येने विश्रांती घेतात.

वटवाघळे फळबागांचे नुकसान करतात. आपल्या वजनापेक्षाही अधिक वजनाचे अन्न ते एकाच बैठकीत फस्त करतात. ते फळ खाण्यापेक्षा त्याचा रस शोषून घेऊन चोथा टाकून देतात. सायंकाळ होताच वटवाघळे अन्न शोधण्यासाठी बाहेर पडतात. प्रथम ती पाणवठ्याकडे जातात. उडताउडताच ती पाण्याच्या पृष्ठभागाला स्पर्श करून अधांतरी पाणी पितात.

वटवाघळांचे डोळे मोठे, बटबटीत असतात. रात्री त्यांना चांगले दिसते, पण अगदीच काळोख असेल तर मात्र त्यांना दिसत नाही. वटवाघळांच्या फार थोड्या प्रजातींजवळ रडारयंत्रणा असते. फळे खाणाऱ्यांपेक्षा कीटक खाणाऱ्या वटवाघळांत रडारयंत्रणा जास्त प्रमाणात असते. वटवाघळे एक विशिष्ट आवाज काढतात आणि परावर्तित ध्वनि लहरींवरून अडथळा किंवा एखादा कीटक किती दूर आहे, केवढ्या आकाराचा आहे, त्याचा क्षणार्धात अंदाज बांधतात.

वटवाघळे पडक्या इमारतींतून, गुहांतून राहातात. म्हणून लोकांचा या प्राण्यांकडे पाहाण्याचा दृष्टीकोन चांगला नाही. वटवाघळे फळझाडांचे नुकसान करतात ही एक बाजू झाली, पण दुसरीकडे उपद्रवी किड्यांना खाऊन पिकांचे रक्षण करण्यास हातभार लावतात ही जमेची बाजू! तसेच बीजप्रसार आणि परागीभवनही ती करतात.

'बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी'तर्फे 'हॉर्नबिल' नावाचे जे त्रैमासिक निघते त्यात डॉ. टुटल या वटवाघळ -तज्ज्ञाने लिहिले आहे की, वटवाघुळे फळबागांचे नुकसान करीत असली तरी ते फार मोठे नसते. कारण वटवाघळे अगदी पिकलेली फळे असतील तरच खातात, कच्च्या फळांना तोंड लावत नाहीत. फार पिकलेली फळे बाजारात पाठवण्यायोग्य नसतात. यामुळे हे नुकसान मोठे मानता येणार नाही.


***

**– कु. मानसी सुळे,** (९ वी)
**'बहर'**, अभिनव ज्ञानमंदिर, कर्जत.



**स्वप्न निळे ते बसे अंगणी हिरव्या वेली वरी। आकाशाचा आशीर्वादच आला माझ्या घरी।।**

यह संसार जीत-हार का खेल है, इसे नाटक समझकर चलो। **प्रायोजक : श्री. व सौ. नगरकर, पुणे.**




**प्र**दूषण गेली काही वर्षे दररोज कोणत्या ना कोणत्या संदर्भात कानी पडणारा शब्द. वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण, वाढते औद्योगिकीकरण इत्यादीमुळे प्रदूषणाची ही समस्या कमी होण्याऐवजी वाढतेच आहे. दैनंदिन जीवनात निर्माण होणारा कचरा व टाकाऊ पदार्थ यांची विल्हेवाट लावण्याची समस्या फार मोठी आहे. ग्रामीण भागात, शहरांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्यामुळे व औद्योगिक कचऱ्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या व त्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाचे गांभीर्य थोड्या प्रमाणात लोकांना जाणवू लागले आहे.

घरातील, कार्यालयातील, शेतांतील, रस्त्यांवरील आणि कारखान्यांतील टाकाऊ म्हणून एकत्रित केलेली घाण म्हणजे कचरा. उपयोगी वस्तूंच्या वापरातूनच माणूस कचरा निर्माण करतो. शहरांत तसेच ग्रामीण भागांत आज कचऱ्याचे प्रचंड ढीग दिसतात. कचऱ्याचे हे ढीग उकिरड्यांच्या रूपात, कचराकुंड्यांच्या रूपात तसेच जमिनीवरील खड्ड्यांत साठविले जातात व काही वेळा तर इतस्तत: फेकून दिले जातात. 'गाव तिथे उकिरडा' अशी म्हण प्रचलित आहे. यावरून आम्हा भारतीयांची मानसिकता कळते. लोकसंख्या वाढीबरोबरच कचऱ्याचे ढीगही वाढतात. आपल्या गरजेपेक्षा आपण फार जास्त वस्तू विकत घेतो आणि कारण नसतानाही अनेक गोष्टी फेकून देतो. अलीकडे सर्व गोष्टी प्लॅस्टिकच्या पिशव्यांमध्ये घेऊन जाण्याची सवय लोकांना लागली आहे.

कचरा म्हणजे अनेक प्रकारच्या रोगराईला आमंत्रण ! प्लास्टिकसारखा कचरा अनेक वर्षे टिकून राहातो. त्याचे विघटन लवकर होत नाही. अनेक वर्षांपासून आपण कचरा जाळतो आहोत किंवा जमीन, नद्या-समुद्रात फेकून देत आहोत. पण त्यामुळेच हवा, पाणी व भूमीचे प्रदूषण होते.

दररोज दरडोई सरासरी दोन किलो घाण-कचरा मनुष्य तयार करीत असतो. पुण्यामध्ये रोज १००० टन घनकचरा गोळा होतो. बंगलोरमध्ये २१३० टन, चेन्नईत २६७५ टन, कोलकातामध्ये ३५०० टन, दिल्लीत ३८८० टन तर मुंबईत ५८०० टन घनकचरा गोळा केला जातो. पुढारलेल्या देशांत यापेक्षा कितीतरी जास्त कचरा तयार होत असतो. जितका देश अधिक विकसित तितका तेथे कचरा अधिक हे जणू समीकरणच हल्ली झाले आहे.

कचऱ्यांत भाजीपाल्याचा पाला-पाचोळा, फळांच्या साली, बिया, सडका, खराब, वाळलेला, बुरा आलेला भाजीपाला, वाया गेलेले, विटलेले, शिळे अन्नपदार्थ इ. अनेक सेंद्रिय पदार्थ असतात. भारतासारख्या उष्णकटिबंधातील हवामानांत हे पदार्थ लवकर कुजतात. त्यावर सूक्ष्म जंतूंची क्रिया सुरू होते. त्यामुळे त्या पदार्थांचे विघटन होते. दुर्गंधी पसरविणारे वायू तयार होतात आणि वातावरण दूषित होते. म्हणजेच हवेचे प्रदूषण होते. परंतु माश्यांना मात्र हा कचरा अतिशय आवडतो. उकिरड्यावर माश्यांची पैदास झपाट्याने होते. त्यांचा इतरत्र फैलाव होतो. त्यामुळे रोगही फैलावतात.

लोकसंख्येच्या वाढीमुळे अलीकडे लहान-मोठ्या हॉस्पिटलची संख्या वाढत आहे. त्यामुळे हॉस्पिटलमधून बाहेर पडणारा कचरा देखील दररोज मोठ्या प्रमाणात वाढत आहे.



**सगळे मिळुनी स्वच्छतेचा, आग्रह सारे धरुया! धरती अपुली करण्या सुंदर, एकत्वाने झटूया!!**

घनकचऱ्यामध्ये वजनाला कमी परंतु अत्यंत धोकादायक असा हा घनकचरा आहे. यामध्ये रक्तमिश्रित कापूस, बँडेजच्या पट्ट्या, मृत अवयव, पॅथॉलॉजिकल वेस्ट म्हणजे रक्त, लघवी, थुंकी वगैरे, इंजेक्शनच्या मोकळ्या बाटल्या, सुया, सलाईन, पाऊचेस आणि इतर फेकून देण्यात येणाऱ्या कचऱ्याचा समावेश होतो. हा घनकचरा प्रमाणात थोडा असला तरी शहरांमध्ये त्याची रोगराई पसरविण्याची क्षमता खूप मोठी आहे.

वाढत्या लोकसंख्येमुळे वाहनांची संख्याही वाढत आहे. वाहनांमुळे वाढणारे प्रदूषण हा तर एक स्वतंत्र लेखाचाच विषय आहे.

कचरा व प्रदूषण टाळण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी खालील त्रिसूत्री अमलात आणणे आवश्यक आहे असे वाटते.

**१) कचरा कमी करा.**

**२) त्यावर काही प्रक्रिया करून त्यातील घटकांचा पुन: वापर करा.**

**३) कचऱ्यापासून पुन्हा निर्मिती करा.**

वरील त्रिसूत्री अमलात आणणे महत्त्वाचे आहे, कारण आपली नैसर्गिक साधनसंपत्ती मर्यादित आहे आणि सततच्या वापरामुळे ती हळूहळू दुर्मिळ होत आहे. त्यामुळे त्यांचा पुन्हा वापर करून वा पुन्हा उपयोगात आणून आपल्या साधनसामग्रीची बचत करू शकतो. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली नाही तर त्याचे पर्यावरण व आरोग्यावर अनिष्ट परिणाम होतात.

आपली पृथ्वी एकुलती एक आहे. तिथे जे निर्माण होते व जे त्याज्य म्हणून फेकले जाते, ते सर्व पृथ्वीवरच राहाणार आहे. संपूर्ण विश्वात पृथ्वी हा एकच ग्रह 'जीवन' धारण करण्यास योग्य आहे आणि कचराप्रदूषणाविरुद्ध योग्य आहे आणि कचराप्रदूषणाविरुद्ध युद्ध लढविणे हे आपले कर्तव्य आहे.

✻✻✻

**– चि. कौस्तुभ भुरके,** (८ वी)
'कस्तुरी' न्यू इंग्लिश स्कूल,
सातारा.

**चित्रकार :** विराज नारळकर (८ वी)


# वातीची करामत
## (एक वैज्ञानिक प्रयोग)

वैज्ञानिक शोध हा कधीही ठरवून लागत नसतो. बहुतेक शोध एखाद्या समस्येवर उपाय शोधताना लागतात. हा प्रयोगही त्याच प्रकारचा आहे.

जर कंदिलाच्या वातीतून तेल वर येते तर पाणी निश्चितच यायला हवे. वातीच्या साहाय्याने कुंडीतील माती भिजेल का? या प्रश्नाचे उत्तर शोधण्यासाठी आपण खालील प्रयोग करू.

या प्रयोगासाठी कोणत्याही विशेष कारागिराची वा खास कौशल्याची गरज नाही. हा प्रयोग कोणत्याही व्यक्तीला घरी करता येऊ शकतो.

**कृती :** एक प्लॅस्टिकची कुंडी घ्या. त्या कुंडीच्या तळाला भोके पाडा. भोकातून वाती ओवा. कुंडीत माती भरून त्यात एक झाड लावा. ही कुंडी पाणी असलेल्या बरणीवर ठेवा. कुंडीतील वाती पाण्यात बुडतील याची काळजी घ्या. आपली रचना खालील प्रमाणे होईल.




**उपयोग :** ★ कुंडीतील बादलीमध्ये पाणी भरून ठेवले असता दररोज कुंड्यांना पाणी घालावे लागत नाही.

★ बाष्पीभवनाने पाणी वाया जाण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

★ दोन-चार दिवस बाहेरगावी गेलो तरी कुंड्यांची काळजी राहात नाही.

★ मुळांना आवश्यक तेवढे पाणी सतत मिळते. प्रवाही खतांचाही अशाच प्रकारे वापर करता येईल.

❒ ❒ ❒

संकलन - कु. श्वेतांगी कोळी
सौजन्य- कु. मयुरा साबणे
विज्ञान प्रदर्शन- जिल्हास्तरीय
विजेती) **'भरारी'** ज्ञान प्रबोधिनी
केंद्र, रसायनी.



**खेळा, नाचा आणि बागडा! प्रसन्न परिसर राखूया! सदा सर्वदा खुलेल ऐसा! रंग वेगळा देऊया!!**
होऊ या सभासद 'छात्र प्रबोधन'चे, रुजवू या बीज मनी राष्ट्रसेवेचे!




# कविता पानोपानी

मला एक कळत नाही !
ही मोठी माणसे असेच का हो करतात?
'हे नको- ते नको' अशी बंधने लहानांवरच का लादतात?
बाबा येतात ऑफिस सुटल्यावर, अतिशय दमून
चिडतात माझ्यावर, जर मी बसले 'कार्टून' लावून।
लहान आहे म्हणून मला सारखे छोट्या कामांना लावतात
हे कर- ते करू नको असे सारखे ते मला सांगतात।
दादा येतो कॉलेजमधून, फ्रेश मूड मध्ये
सांगतो माझ्या प्रत्येक गोष्टीत, करू नको तू मधे-मधे।
येता जाता माझ्या डोक्यात टपला मारत असतो
मी जरा रडले की मला रडकी म्हणून चिडवतो।
आईदेखील म्हणते बाळोबा, लागा आता अभ्यासाला
इकडे तिकडे न भटकता, तुमचा गृहपाठ पूर्ण करा।
टी.व्ही. बघू नका तुम्ही गाणी ऐकू नका
टंगळ-मंगळ करून तुम्ही, अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नका।
मला एक कळत नाही
ही मोठी माणसे अशीच का हो करतात?

***

**- कु. वृंदा नांदगिरीकर,** (९ वी)
**'बीज अंकुरे अंकुरे'**
चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली.

दोन्ही कवितांची चित्रे **केतकी सावरगावकर** (१० वी)

# शिंपल्यांची माळ


पावसाच्या त्या दिवसात
वर्षेच्या त्या जल्लोषात

उगवली माझ्या अंगणात
नवी रोपं, नवी पात

हिरवे झाले रानमाळ
त्यावर शिंपल्यांची ती माळ

जेव्हा पालटला दिस
तेव्हा गेली ती आरास

पण झाडावर मात्र होती
मोत्यांची ती नाजूक रास



होत्या रंगीत त्या कळ्या
झाल्या फुलांच्या साखळ्या


जसा गेला तो पाऊस
गेली गोड ती आरास

***


**– कु. दीप्ती चव्हाण**
**'बीज अंकुरे अंकुरे'**
चंद्रकांत पाटकर विद्यालय,
डोंबिवली.


दोन्ही कवितांची चित्रे **केतकी सावरगावकर** (१० वी)

# व्हॅलेंटाइन डे : बदलता दृष्टिकोन




**कु. मीनल अकोले**
**– कु. शर्वरी कुलकर्णी**

*स्वप्नांचे निळे मोर*
*मनात नाचू लागतात*
*दोन मनं एकमेकांशी*
*संवाद करू लागतात...*

एक अविस्मरणीय दिवस. तो म्हणजे 'व्हॅलेंटाईन डे' १४ फेब्रुवारी! दोन प्रेमी जीव वर्षभर याच क्षणाची तर वाट बघत असतात. पण ह्याचा खरा पुरस्कर्ता होता तो ख्रिस्तपूर्व काळातील धर्मगुरू 'व्हॅलेंटाईन' आणि 'व्हॅलेंटाईन डे' चा जन्मही ख्रिस्तपूर्व काळातलाच!

विवाहामुळे सैनिक घर-संसारात अडकून पडतात आणि युद्धभूमीवर जाण्यास तयार होत नाहीत. अशा समजुतीमुळे रोमन सम्राट दुसरा क्लायडिस याने कायद्यानेच विवाहावर बंदी घातली. तरी या प्रेमजीवनाच्या पुरस्कर्त्याने क्लायडिसचा हुकूम झुगारला.

अनेक तरुण प्रेमीजीवांना एकत्र आणले. सेंट व्हॅलेंटाईनची मजल पाहिल्यावर क्लायडिस संतापला व त्याने त्याला तुरुंगात टाकले. पण हा व्हॅलेंटाईन साऱ्या प्रेमी युगुलांचा लाडका कसा बनला यामगचा प्रसंग खूप सुंदर आहे. तो असा-



तुरुंगात असताना खिडकीबाहेर व्हॅलेंटाईनला पुष्कळ व्हायोलेटची झाडे दिसली. त्याने बदामाच्या आकाराची ती पाने तोडून त्यावर 'तुझ्या व्हॅलेंटाईनची आठवण ठेव' असे शब्द कोरले व मनातला हा शेवटचा प्रेमसंदेश तुरुंग अधिकाऱ्याची अंध मुलगी 'ॲस्टेरियस' हिच्याकडे पाठवला. पण तिला तो कळला कसा? जरा विचार करा ! तर आपल्या आंतरिक श्रद्धेच्या जोरावर त्याने ॲस्टेरियसचे अंधत्व दूर केले होते.

पण त्यांच्या प्रेमाचे दुर्दैव असे की रोमन धर्म स्वीकारण्यास नकार दिल्याने अखेर ख्रिस्तपूर्व २७० मध्ये १४ फेब्रुवारीला प्रेमिकांना देवदूतासमान वाटणारा, त्यांच्या प्रेमाला साथ देणारा व्हॅलेंटाईन काळाच्या पडद्याआड गेला. म्हणून हा दिवस जगातील लोक एकमेकांमधील नात्यांतील प्रेमाचा सुगंध बहरून आणण्यासाठी साजरा करतात. एकमेकांच्या मनातील भावनांना भेटवस्तूंद्वारे वा गुलाबपुष्पांद्वारे वाट मोकळी करून देतात आणि प्रेमाच्या या वैश्विक सोहळ्यातील एक युगुल बनून जातात. हे जरी खरे असले तरीही 'व्हॅलेंटाईन डे' हा फक्त दोन प्रेमीयुगुलांसाठीच असतो असे नाही तर हा दिवस दोन मैत्रिणी, दोन मित्र, दोन बहिणी, दोन भाऊ यांसाठीही असतो.

'प्रेम' हे म्हटल्याने होत नाही ते मनातून जाणवावं लागतं. पण काही स्वार्थी विचारधारणेच्या व्यक्तींचा असा समज आहे की, 'ती जर आपली नाही, तर कोणाचीच नाही' आणि मग अशातूनच अनेक अमृता देशपांडे, रिंकू पाटील, विद्या प्रभुदेसाई यांचे बळी जातात.

तसेच आजकाल फक्त कॉलेजमध्येच नाही, तर शाळांतसुद्धा बॉयफ्रेंड्स-गर्लफ्रेंड्स बदलणे हे प्रकार सर्रास चालतात. पण नंतर यातूनच अनेक गैरसमजुती पसरतात आणि खऱ्या प्रेमाची टिंगल केली जाते. आपले दुर्दैव असे की ही पाश्चात्य संस्कृती भारतात झपाट्याने फोफावत आहे. म्हणूनच आज असे विचारावेसे

वाटत संस्कृतीचे अनुकरण योग्य का?'

त्यामुळे शाळांमध्ये तर ब्लॅकलिस्ट लावाव्या लागतात आणि 'व्हॅलेंटाईन डे' च्या आधी विद्यार्थ्यांच्या बॅग्ज चेक कराव्या लागतात. त्यात अभ्यासाचा वेळ वाया जातो. शेवटी नुकसान हे विद्यार्थ्यांचेच होते. याला अंशत: कारणीभूत आहे ते म्हणजे या दिवसाला प्राप्त झालेले आकर्षक व व्यावसायिक स्वरूप.' या दिवसासाठी खास निघणाऱ्या कॅसेट्स, कार्ड्स, गिफ्ट्स, विविध चॅनलद्वारे आपले प्रेम व्यक्त करण्यास असलेल्या उपलब्धता. यांमुळे तर यात अधिकच भर पडत आहे.

या सगळ्यामुळे जगातून निखळ, निरपेक्ष प्रेम नाहीसे होईल, अशी भीती वाटते. म्हणून अंधानुकरण करणाऱ्या युवक-युवतींची विचारसरणी बदलायची कशी?

जवळ जवळ बरेच युवक-युवती 'व्हॅलेंटाईन डे' चा इतिहास माहीत नसतानाही तो साजरा करतात. या दिवशी 'व्हॅलेंटाईन डे' चा इतिहास प्रसार माध्यमांद्वारे प्रसृत केला जातो. ते आवश्यकच आहे. शाळांतही 'नैतिक मूल्य' या तासिकेला विशेषत: ९ वी १० वी अशा वर्गांना या दिवसाचा इतिहास व खऱ्या प्रेमाची व्यापक दृष्टिकोनातून व्याख्या सांगितली पाहिजे.

प्रसार माध्यमांद्वारे हा दिवस केवळ प्रेमजीवांसाठी नसून आपल्या जीवनातील खास व्यक्तींसाठी सुद्धा आहे, हे प्रसृत केले आहे.

'व्हॅलेंटाईन डे': दोन प्रेमिकांमधील प्रेमाचाच दिवस, हा संभ्रम प्रसारमाध्यमांनीच काही अंशी पसरवला आहे. तो त्यांनीच दूर केला पाहिजे. यावेळी लावल्या जाणाऱ्या कॅसेट्समधील गाणीसुद्धा त्यालाच अनुसरून असतात. या गाण्यांतील नाते-संबंध बदलून इतर नात्यांचा (आई, वडील, बहीण, भाऊ) विचार करून कॅसेट्सची व प्रसार-माध्यमांवरील कार्यक्रमांची रचना केली पाहिजे. जेणे करून समाजाचा दृष्टिकोन बदलण्यास मदत होईल.

मग काय? करणार ना आत्मपरीक्षण?

✻✻✻

**कु. मीनल अकोले**
**कु. शर्वरी कुलकर्णी**, (इ. ९ वी)
**'बीज अंकुरे अंकुरे'**
चंद्रकांत पाटकर विद्यालय, डोंबिवली
**चित्रकार :केतकी सावरगावकर** (१०वी)

## गणगोत

निसर्गचित्र पाहिले असता मनात विविध विचार दाटून येतात. आपण विविध प्रकारची, फुला-फळांची झाडे पाहातो. अशावेळी निसर्गातील एक-एक चमत्कार टिपले जातात. असे एक निसर्गातील आश्चर्य आम्ही अभ्यास सहलीला 'ऐना' येथे गेलो असताना पाहिले.



ऐना-दाभोळ रस्त्यावरील हे दृश्य पाहून आमचा प्रबोधक मित्र रोहित कोकीळ याने त्याचे प्रकाशचित्र इतके कलात्मकरितीने टिपले की पाहातच राहावे. वादळामुळे पडलेले झाड आजूबाजूंच्या झाडांचे आधार घेत पुन्हा फुटले आणि तेच नंतर त्यांनाही आधार झाले. माणसात काय पण निसर्गातला हा आधार पाहून, थक्क व्हायला झाले. किती वेगळे हे नाते! किती सुरेख हे 'गणगोत!'

***

– प्रतिक म्हात्रे (इ. ६ वी)
**'भरारी'** ज्ञान प्रबोधिनी
केंद्र, रसायनी.

# एप्रिल-मेमधील छात्रप्रबोधन द्वारा आयोजित शिबिरांचे वृत्त

● **मुलांचे नेतृत्व शिबिर –** २२ ते २९ मार्च रोजी साळुंब्रे येथे मुलांचे नेतृत्व शिबिर झाले. इ. १० वी व १२ वी ची परीक्षा दिलेले विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले होते. शिबिराच्या शेवटच्या तीन दिवसात सहल आयोजित केली होती. राजमाची ते ढाकचा भैरी ती सहल झाली. १०/१२ गावांमधून मुले या शिबिरासाठी आली होती. एकूणच शिबिर छान झाले.

● **व्यक्तिमत्त्व विकसन शिबिर –** दि. १ ते ७ एप्रिल या दरम्यान गोव्यातील रायबंदर येथील, बालविद्यामंदिरमध्ये हे शिबिर झाले. या शिबिरात ८ वीतून ९ वीत जाणारी मुले व मुली सहभागी झाल्या होत्या. गोव्यातील ११ तालुक्यांपैकी ९ तालुक्यातील २० शाळांमधील विद्यार्थी या शिबिरात होते. या शिबिरासाठी १०-१२ स्थानिक शिक्षकांनी अतिशय मनापासून काम केले. भोजन, निवास व अन्य तांत्रिक व्यवस्था याचे नियोजन केले होते. शिबिराबाबतच्या आशयाचे संपूर्ण स्वातंत्र्य असल्यामुळे शिबिर घेण्यात कोणतीच अडचण आली नाही. स्वयंअध्ययन कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकसनाची व्याख्या, कौशल्याची कृतिसत्रे, गटकार्य, समूहगायन, विज्ञानप्रयोग इ. वैविध्यपूर्ण विषय शिबिरात घेण्यात आले. शिबिरासाठी पुण्यातून प्रा. अनघाताई अडोणी, किरण मुसळे, प्रसाद कापरे हे आले होते. सांगलीहून अमर परांजपे, विजय निकम, स्वातीताई कुलकर्णी व प्राजक्ता कोटीभास्कर आले होते. स्थानिक संयोजकांना शिबिर संयोजनात सहभागी करून घेतले, असे या शिबिरात प्रथम घडले.

● **मुलींचे नेतृत्व शिबिर –** दि. ८ ते १४ एप्रिल रोजी साळुंब्रे येथेच मुलींचे नेतृत्व शिबिर झाले. सुमारे १५ जिल्ह्यांमधून ६६ मुली या शिबिरासाठी आल्या होत्या. १० वी व १२ वीची परीक्षा दिलेल्या मुली शिबिरात सहभागी झाल्या होत्या. आशयाच्या दृष्टीने मुलांपेक्षा हे शिबिर अधिक चांगले झाले. नेतृत्वाचे पैलू, नियोजनकौशल्य, गटचर्चा, गटकार्य ही सत्रे विशेष रंगली. एकूण गटाचा बौद्धिक स्तर चांगला वाटला. शिबिराच्या शेवटी साळुंब्रे येथील शाळेतील विद्यार्थ्यांचा ३ तासांचा मेळावा विद्यार्थ्यांनी घेतला. ५ दिवसांच्या शिबिरानंतर लोहगड विसापूर येथे मुक्कामी सहल गेली होती. शिबिर शैक्षणिक विस्तारक (युवती) यांनी घेतले. एकूण शिबिर छान झाले.

● **अग्रणी प्रशिक्षण शिबिर –** दि. १५ ते २२ एप्रिल दरम्यान नाशिक येथे अग्रणी प्रशिक्षण शिबिर झाले. नाशिक येथील ५ शाळांमधील ११२ विद्यार्थी (८ वीतून ९ वीत जाणारी मुले) या शिबिरात सहभागी झाले. त्यांच्यासोबत प्रत्येक शाळेचे २-३ शिक्षकही पूर्णवेळ सहभागी झाले होते. अशाप्रकारे शिबिर पहिल्यांदाच योजले जात होते. शिबिराचा दिनक्रम पुरेसा बांधीव असूनही विद्यार्थी सकाळी ८ ते संध्याकाळी ६ पूर्ण वेळ अतिशय उत्साहाने प्रत्येक उपक्रमात सहभाग घेत होते. विद्यार्थ्यांचा गट बौद्धिकदृष्ट्या चांगल्या क्षमतेचा वाटला. या सर्व विद्यार्थ्यांच्या, प्रज्ञा मानस संशोधिकेच्यावतीने विविध बौद्धिक क्षमतांच्या चाचण्या घेतल्या गेल्या. एकूण शिबिर छान झाले.

● **विज्ञान शिबिर –** नववीत जाणाऱ्या व बारावीपर्यंतच्या मुला-मुलींसाठी १० ते १८ मे २००१ (मुलांसाठी) व १५ ते २३ मे २००१ (मुलींसाठी) रोजी विज्ञान शिबिर होणार आहे, हे लक्षात आहे ना? त्याविषयी सविस्तर पुढच्या अंकात वाचूया.)



**हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर ११ चैत्र शके १९२३, १ एप्रिल २००१ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातुबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.**

**निसर्गात आम्हा दिसो दिव्यमूर्ती, 'जनी नांदतो देव', स्मरो हीच उक्ती**

सर्वांगीण विकसनातून मिळवून देण्या आत्मविश्वास, छात्र प्रबोधन मासिकाचा नित्य असे हा ध्यास!

## छात्र प्रबोधनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या यंदाच्या हस्तलिखित स्पर्धेतील विविध हस्तलिखितांमधील उत्तम चित्रे



**स्नेहा भालेराव,** (९वी)
**'सौरभ'**, टिळकनगर विद्यामंदिर,
डोंबिवली.



**अजय,** (९वी)
**'सौरभ'**, टिळकनगर विद्यामंदिर,
डोंबिवली.



**नीलेश पाटील,** (८वी)
**'हृदयपुष्प'** अभिनव ज्ञान मंदिर प्रशाला,
कर्जत, जि. रायगड.



**हेमंत वैद्य,** (८वी)
**'भरारी'** टिळकनगर विद्यामंदिर,
डोंबिवली.

# आमुचा महाराष्ट्र देश



*उत्क्रांतीचा आज अम्हाला*
*देइ नव संदेश*
*आमुचा, महाराष्ट्र हा देश ।।धृ॥*

*थोर आमुची माय मराठी*
*प्रेम देतसे सकलांसाठी*
*संत जनांच्या घेण्या भेटी*
*इथे येइ परमेश*
*आमुचा, महाराष्ट्र हा देश ।।१।।*

*'जातपात' हा विचार सोडुन*
*समानतेचा धागा जोडुन*
*मानवतेचा सदा अम्हाला*
*नित्य देइ आदेश*
*आमुचा, महाराष्ट्र हा देश ।।२।।*

*कृतीशीलता इथले भूषण*
*नकोच आता केवळ भाषण*
*परस्परांचे नकोच शोषण*
*करी असा उपदेश*
*आमुचा, महाराष्ट्र हा देश ।।३।।*

*इथल्या व्यक्ती, इथले नायक*
*सत्य शिवाचे व्हावे पाइक*
*श्रम शौर्याची शर्थ कराया*
*मनास दे आदेश*
*आमुचा, महाराष्ट्र हा देश ।।४।।*

- बजरंग सरोदे
अकोला


**संपर्क पत्ता :** संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१० सदाशिव पेठ,
पुणे 411030.
☎ (०२०) ४४७७६९१, ४४७८०९५
**कार्यालयाची वेळ** : स.१० ते संध्या.७
**या अंकाची किंमत** : रु.१२/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १५०/-
**प्रकाशन दिनांक** : सौर ११ वैशाख, शके १९२३
१ मे २००१

**Book Post /पुस्तडाक**
**(छापील मजकूर)**